# स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड.

**स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड, यांस**
**मानव्यविद्याशाखांतर्गत पीएच.डी. (विद्यावाचस्पति) पदवी करीता सादर**
**करावयाचा शोध प्रबंध**

# *"हितोपदेश, पञ्चतन्त्र आणि कथासरित्सागर यांचे विवेचनात्मक अध्ययन"*


**संशोधिका**
**मनिषा विजयकुमार तांदळे**
शिक्षिका, यशवंत महाविद्यालय,
नांदेड.

**मार्गदर्शक**
**प्रा.डॉ. गणंजय यज्ञेश्वरराव कहाळेकर**
संस्कृत विभाग प्रमुख
महात्मा ज्योतिबा फुले महाविद्यालय, मुखेड.



**नोव्हेंबर २०१८**

# अनुक्रमणिका


| | |
|---|---|
| **प्रकरण १.** | **शोधप्रबंधाची रूपरेषा** |
| १.१. | विषय निवडीचे प्रयोजन |
| १.२. | संशोधनाचे महत्त्व |
| १.३. | संशोधनाची व्याप्ती |
| १.४. | संशोधनाच्या पद्धती |
| १.५. | संशोधनाची उद्दिष्ट्ये |
| १.६. | गृहितके |
| १.७. | प्रकरण योजना |
| **प्रकरण २.** | **कथासाहित्य आणि नीतिकथा** |
| २.१. | कथासाहित्याची उत्पत्ती आणि विकास |
| २.२. | कथेचे प्रकार |
| २.३. | नीतिकथेचे हेतू व स्वरूप |
| २.४. | नीतिकथेचे महत्त्व |
| २.५. | नीतिकथांची विशेषता |
| **प्रकरण ३.** | **हितोपदेश, पञ्चतन्त्र आणि कथासरित्सागर या ग्रंथाचा परिचय आणि महत्त्व** |
| ३.१. | हितोपदेश ग्रंथाचा परिचय आणि महत्त्व |
| ३.२. | पञ्चतन्त्र ग्रंथाचा परिचय आणि महत्त्व |
| ३.३. | कथासरित्सागर ग्रंथाचा परिचय |
| **प्रकरण ४.** | **हितोपदेश, पञ्चतन्त्र आणि कथासरित्सागर ग्रंथातील निवडक कथांचा आशय** |
| ४.१. | हितोपदेश ग्रंथातील कथांचा आशय |

| | |
|---|---|
| ४.२. | पञ्चतन्त्र ग्रंथातील कथांचा आशय |
| ४.३. | कथासरित्सागर ग्रंथातील कथांचा आशय |
| **प्रकरण ५.** | **हितोपदेश, पञ्चतन्त्र आणि कथासरित्सागर ग्रंथातील पात्रवैविध्य** |
| ५.१. | हितोपदेश ग्रंथातील पात्र वैविध्य |
| ५.२. | पञ्चतन्त्र ग्रंथातील पात्र वैविध्य |
| ५.३. | कथासरित्सागर ग्रंथातील पात्र वैविध्य |
| **प्रकरण ६.** | **हितोपदेश, पञ्चतन्त्र आणि कथासरित्सागर ग्रंथातील मूल्यांचा अभ्यास** |
| ६.१. | हितोपदेश ग्रंथातील मूल्ये |
| ६.२. | पञ्चतन्त्र ग्रंथातील मूल्ये |
| ६.३. | कथासरित्सागर ग्रंथातील मूल्ये |
| **प्रकरण ७.** | **पञ्चतन्त्र काळातील घटकांचे अध्ययन (सामाजिक, राजनैतिक, प्रशासन आणि न्यायव्यवस्था तसेच भौगोलिक घटक)** |
| ७.१. | पञ्चतन्त्रकाळातील सामाजिक घटक |
| ७.१.१. | कुटुंब सामाजिक संरचनेचा आधार |
| ७.१.२. | पञ्चतन्त्रकालीन वर्णव्यवस्था |
| ७.१.३. | जाति–व्यवस्था |
| ७.१.४. | समाजातील निर्धन व्यक्तींची स्थिती |
| ७.१.५. | समाजातील उपष्टम्भकारी घटक |
| ७.१.६. | आश्रमव्यवस्था |
| ७.१.७. | पञ्चतन्त्रातील स्त्री |

| | |
|---|---|
| | १. स्त्री जीवनातील विविध टप्पे |
| | २. स्त्रीनिंदा |
| ७.१.८. | विवाह, वंश व वय |
| | १. वर-वधूंची अनुरुपता |
| | २. वरान्वेषण आणि हुंडापद्धती |
| | ३. विवाहाचे घटक |
| | ४. विवाहाचे प्रकार |
| | ५. वृद्ध-विवाह |
| | ६. बहु-विवाह |
| ७.१.९. | खान-पान, वेशभूषा आणि मनोरंजनाचे साधन |
| ७.१.१०. | पञ्चतन्त्रातील अर्थव्यवस्था |
| | १. अर्थाचे महत्त्व |
| | २. कृषि |
| | ३. पशु-पालन |
| | ४. व्यापार |
| | ५. इतर साधने |
| ७.१.११. | दळण-वळणाचे साधन |
| ७.१.१२. | पञ्चतन्त्रातील शिक्षण व्यवस्था |
| | १. धार्मिक शिक्षण |
| | २. नैतिक शिक्षण |
| | ३. व्यवसायिक शिक्षण |
| | ४. राजनैतिक शिक्षण |
| ७.१.१३. | धर्म व धार्मिक संप्रदाय |

| | |
|---|---|
| ७.१.१४. | दार्शनिक संप्रदाय |
| ७.१.१५. | पञ्चतन्त्रातील विविध कला |
| ७.१.१६. | क्रीडा |
| ७.२. | पञ्चतन्त्रकाळातील राजकीय घटक |
| ७.२.१. | राज्याचे अंग |
| ७.२.२. | पञ्चतन्त्रातील षाड्गुण्य |
| ७.२.३. | पञ्चतन्त्रातील उपाय |
| ७.२.४. | पञ्चतन्त्रातील मण्डलसिद्धान्त |
| ७.३. | पञ्चतन्त्रकाळातील प्रशासन |
| ७.३.१. | राजतंत्र आणि प्रजातंत्र |
| ७.३.२. | पञ्चतन्त्रातील शासन व्यवस्था |
| ७.३.३. | राजा आणि प्रजेचे परस्पर संबंध |
| ७.३.४. | मंत्री |
| ७.३.५. | राजकर्मचारी (सेवक) |
| ७.३.६. | दूत |
| ७.३.७. | गुप्तचर व्यवस्था |
| ७.३.८. | युद्ध आणि आयुधे |
| ७.४. | पञ्चतन्त्रकाळातील न्याय व्यवस्था |
| ७.५. | पञ्चतन्त्रकाळातील भौगोलिक स्थिती |
| **प्रकरण ८.** | **कथासरित्सागर ग्रंथातील घटकांचे अध्ययन (सांस्कृतिक, भौगोलिक घटक)** |
| ८.१. | कथासरित्सागर ग्रंथाचे सांस्कृतिक अध्ययन |
| ८.१.१. | धर्म |

| | |
|---|---|
| ८.१.२. | वर्णव्यवस्था आणि व्यवसाय |
| ८.१.३. | जातिव्यवस्था |
| ८.१.४. | इस्लामी घटक |
| ८.१.५. | शिक्षण व्यवस्था |
| ८.१.६. | नैतिक स्तर |
| | १. मद्यपान |
| | २. आत्महत्या |
| | ३. उत्कोच (लाचखोरी) आणि भ्रष्टाचार |
| | ४. फसवणूक |
| ८.१.७. | स्त्री–चरित्र |
| ८.१.८. | देवदासी |
| ८.१.९. | उत्सव |
| ८.१.१०. | श्रृंगार प्रसाधन |
| ८.१.११. | मनोरंजन |
| ८.१.१२. | पशु–पक्षीपालन |
| ८.१.१३. | खेळणी |
| ८.१.१४. | अन्न–पान |
| ८.२. | कथासरित्सागर काळातील भौगोलिक घटक |
| **प्रकरण ९.** | **हितोपदेश, पञ्चतन्त्र आणि कथासरित्सागर ग्रंथाचे तौलोनिक अध्ययन** |
| **प्रकरण १०.** | **उपसंहार** |
| ♦ | **संदर्भ ग्रंथ सूचि** |

## प्रकरण पहिले
## शोधप्रबंधाची रुपरेषा

संस्कृत साहित्यात कथासाहित्याला महत्त्वाचे स्थान आहे. कथासाहित्याची रोचकता, सहजता, मधुरता आणि उपदेशात्मकतेची सर्व विद्वानांकडून प्रशंसा करण्यात आली आहे. कथासाहित्यात व्यक्ती विशेषाचे नाव ठेवून पशु-पक्षी वा अन्य जीवाला त्याच्या प्रतीक रूपात ठेवले आहे. या कथा नैतिक शिक्षण, आचार शिक्षण आणि कर्तव्याचा उपदेश करतात.

प्राचीन काळापासून समाज प्रबोधनाचे कार्य अनेक माध्यमातून होत आले आहे. गुरू-शिष्य परंपरेतून, प्रवचन-कीर्तनातून, श्राव्य आणि दृकश्राव्य माध्यमातनू हे कार्य होते. तसेच आकाशवाणी, दूरदर्शन, चित्रपट, नाटक या प्रभावी माध्यमातून त्यातील कथांच्या आशयातून समाजाला जागृत करण्याचे कार्य घडत आले आहे. या सर्वांचे मूळ कथाच आहेत. आज समाजाला नीतिमूल्यांची आवश्यकता आहे. नीतिमूल्ये ही शाश्वत आणि चिरंतन सत्य असतात.

आज देशात दिसणारी राजकीय, सामाजिक व सांस्कृतिक परिस्थिती मनाला उद्विग्न करणारी आहे. समाजात चारित्र्य, तात्विक अधिष्ठान आणि मानवीय नैतिक मूल्यांचे अधःपतन प्रकर्षाने जाणवते आहे. तसेच सदाचार व विवेक नष्ट होवून जिकडे तिकडे भ्रष्टाचार व अनीति पसरली आहे. 'मानवी मूल्यांच्या विरोधातील समाजविघातक कृत्य म्हणजे अनैतिकता होय.' हे सर्वजण विसरले आहेत. म्हणूनच जीवनात आपण मूल्ये रूजविण्याच्या दृष्टीने प्रयत्नशील असले पाहिजे.

कथांचा नैतिकतेच्या दृष्टीने विचार केला असता तो प्राणिमात्रांच्या कल्याणासाठी प्रेरित करणारे आणि मानवी जीवन उज्ज्वल करणारे आहेत. त्याबरोबरच आधुनिक जीवनाला उत्कर्षाचे शिखर गाठण्याच्या दिशेने झेप घेणारे आहेत.

या प्रकरणात विषय निवडीचे प्रयोजन, संशोधनाचे महत्त्व, संशोधनाची व्याप्ती, संशोधनाच्या पद्धती, संशोधनाची उद्दिष्ट्ये, गृहीतके, प्रकरण योजना इत्यादि विषयांवर महत्त्वपूर्ण प्रकाश टाकला आहे. तसेच दोन ते दहा पर्यंतच्या प्रकरणांच्या रूपरेषेचे विवेचन करण्यात आले आहे.

### १.१. विषय निवडीचे प्रयोजन

नीतिकथा हे उपदेश करण्याच्या प्रवृत्तीतून निघालेले साहित्य आहे. पण तो उपदेश कंटाळवाणा न होता, मनोरंजक व्हावा या हेतूने नीतिकथांना रोचक रूप मिळाले. मनुष्यास त्रिवर्ग साधन करून देणे, त्यांना व्यवहारात चतुर बनवणे, सदाचार समजावून देऊन धूर्तांच्या

धूर्ततेचा परिचय करून देणे हे कार्य करण्यासाठी नीतिकथांचा संग्रह आहे.

पशुपक्षांचे मनुष्यवत् व्यवहार व नीति या ग्रंथांमध्ये सांगण्यात आले आहे. म्हणून या कथा मानवांसाठी रोचक आणि उपयुक्त आहेत. तसेच ग्रंथातून सामाजिक, सांस्कृतिक आणि राजकीय घटकांची माहिती जाणून घेणे हे विषय निवडीचे प्रयोजन आहे.

## १.२ संशोधनाचे महत्त्व

नैसर्गिकरित्या मानवी जीवनाची निर्मिती ही पवित्र व सर्वश्रेष्ठ आहे. प्राथमिक अवस्थेत मानवाच्या गरजा अन्न व निवारा एवढ्यापुरत्या मर्यादित होत्या. नंतर हळूहळू मानवी गरजांमध्ये शिक्षणाची भर पडली. शिक्षणाच्या जोरावर मानवाने आपल्या बुद्धिमत्तेचा वापर करून प्रगती व यशाची अनेक शिखरे गाठली. मानवी सद्गुण व सदाचार म्हणून शिक्षणाला जीवनात अत्यंत महत्त्व आहे. 'शिक्षण म्हणजे वर्तनात घडून येणारा बदल.' प्रत्येक मानव येणाऱ्या अनुभवानुसार आपल्या वर्तनामध्ये बदल करत असतो. आणि हा अनुभव आपल्याला कथांतून मिळतो.

जीवनाचे लक्ष्य केवळ आदर्शवादिताच नसून लोक व्यवहारज्ञता आणि नीतिनिपुणता आहे. जीवनाच्या यशस्वीतेसाठी आवश्यक सर्व गुणांचे वर्णन या कथांमध्ये आहे. जीवन जगत असताना काही गोष्टी न जाणल्यामुळे मनुष्याचे जीवन अयशस्वी होते. याची जाणीवही या कथातून होते. आपले वर्तन, कृती कशी असावी हे यातून समजते. समाजामध्ये आपले अस्तित्व टिकविण्यासाठी या कथांचा अभ्यास आवश्यक आहे. यात कथा, नीति, सदाचार, व्यवहारज्ञान, धर्म आणि काव्यसौंदर्याचे सुंदर समन्वय आहे.

थोडक्यात व्यवहार शिकविण्यासाठी नीति, चातुर्य, प्रसंगावधान, गांभीर्य, धैर्य, कुसंगतीचे परिणाम, दूरदर्शी, आर्थिक लोभाचे परिणाम, अतिथि सत्कार, स्त्रियांचा स्वभाव, जिज्ञासुवृत्ती, साहस, शुद्ध चारित्र्य हे गुण या नीतिकथेतून समजतात. दुसऱ्याच्या धूर्ततेला मनुष्य कधीच बळी पडणार नाही असे हे नीतिकथांचे शास्त्र आश्वासन देते.

तसेच तत्कालीन भारतीय संस्कृति, सामाजिक आणि राजनैतिक स्थितींचे चांगल्याप्रकारे ज्ञान होण्यासाठी या ग्रंथांचे अध्ययन महत्त्वाचे ठरते.

हितोपदेश हा ग्रंथ नारायण पंडितांनी लिहिला आहे. कथांच्या माध्यमातून बालकांना नैतिक शिक्षण या ग्रंथातून दिले आहे. तसेच या ग्रंथाच्या अध्ययनाने प्राविण्य, वाक्पटुता, व्यवहार चातुर्य मिळवता येईल.

पञ्चतन्त्र हे भारतीय साहित्यातील एक अमूल्य निधी आहे. ही एक उपदेशात्मक पशुकथा

आहे. यात विविध प्राण्यांच्या माध्यमातून तत्कालीन संस्कृति, राजनीति आणि सामाजिक जीवनावर प्रकाश पडला आहे. या ग्रंथाने प्राचीन काळापासूनच विद्वान, राजनीतिज्ञ आणि साहित्यकाराचे लक्ष आपल्याकडे आकर्षित केले आहे. असे म्हटल्यास वावगे ठरणार नाही की या ग्रंथाने भारतीय संस्कृतिचा प्रसार करण्यासाठी फार मोठे योगदान दिले आहे. आजच्या काळातील अनेक सांस्कृतिक मंडळ असे कार्य करीत आहेत.

या ग्रंथात लेखकांनी पञ्चतन्त्रातील वर्ण्य विषय आणि सांस्कृतिक महत्त्वावर प्रकाश टाकले आहे. सामाजिक जीवन, शिक्षण, कला, अर्थव्यवस्था आणि राज्यशास्त्राच्या विविध पैलूंचे विवेचन यात केले आहे. अनेक चित्तवेधक कथा आणि जीवनासाठी उपयोगी असलेले ज्ञान या ग्रंथातून आपणास भेटते. मनोरंजन कथांशिवाय या ग्रंथातून तत्कालीन भारतीय समाजातील काही महत्त्वाच्या विषयांवरही प्रकाश पडतो.

या ग्रंथात जनपद, पर्वत, नदी यांचा उल्लेख आला आहे. यामध्ये वन्य-जीवांचे चित्रण आलेले आहे. तसेच व्याकरणकार, दर्शनासोबतच राजनीतिच्या सिद्धांताचेही संकलन मिळते म्हणून ऐतिहासिक दृष्टीने या ग्रंथाचे मूल्यांकन होवू शकते. यावरून भारतीय इतिहास निर्माणामध्ये पञ्चतन्त्राचे महत्त्व लक्षात येते.

उत्तम स्वास्थ्यासाठी आयुर्वेद शिक्षणाला प्राचीन काळापासूनच महत्त्व आहे. लेखकांनी पञ्चतन्त्रात मंगलाचरण करतेवेळी अश्विनीकुमार वैद्यांचा उल्लेख केला आहे. यावरून हे स्पष्ट होते की त्यांना आयुर्वेदाचे शिक्षण मान्य होते आणि त्याकाळात ते महत्त्वाचे शिक्षण होते.

पञ्चतन्त्रातील अनेक कथांतून सैन्य शिक्षणाचे संकेत मिळतात. या ग्रंथातून राजनैतिक शिक्षणाचेही महत्त्व समजते. ग्रंथाच्या प्रस्तावनेत मनु, बृहस्पति, शुक्राचार्य, व्यास, पराशर इत्यादी मुनींना धर्मशास्त्रानुप्रणीत म्हणून आणि चाणक्याला नीतिकाराचा सन्मान देऊन राजनीतिशास्त्राच्या रूपात नमस्कार केले आहे.

पञ्चतन्त्र राजनीतिच्या तत्त्वांनी भरलेले आहे. ते राज्याच्या सत्ता संचालनासाठी अत्यंत आवश्यक आहे. या रचनेचे पाच तंत्र-मित्रभेद, मित्रसम्प्रारित, काकोलूकीयम्, लब्धप्रणाशम् आणि अपरीक्षितकारकम् हे वास्तविक राजनीतितील उपयोगी सिद्धान्ताचे विभाजन आहे. राजसत्ता संचालनासाठी हे अंग आवश्यक आहेत.

भारतीय जीवनात धर्म नेहमी प्रभावी राहिले आहे. पञ्चतन्त्रातील अनेक उल्लेखांवरून हे स्पष्ट होते की त्या काळात धर्माला महत्त्व होते. मोक्ष मिळविण्याच्या भावनेने भारतीय दर्शनातील विद्वानांनी ज्या सिद्धान्ताला पाहिले ते 'दर्शन' म्हणले गेले. दर्शनात आस्तिक

दर्शन व नास्तिकदर्शन असे प्रकार आहेत. आस्तिकदर्शनात सांख्य, योग, न्याय, वैशेषिक, पूर्वमीमांसा, वेदान्त हे आहेत तर नास्तिक दर्शनात चार्वाक, बौद्ध आणि जैन हे संप्रदाय आहेत.

विष्णुशर्मांनी जैन दर्शनातील दिगम्बर संप्रदायाचा उल्लेख केला आहे. पञ्चतन्त्रातील काळ हा जैन भिक्षूंनी प्रभावित झाला होता आणि मोक्ष प्राप्तीसाठी त्या काळातील समाज उदारतेने जैनवृत्ती स्वीकारीत होता.

प्राचीन काळात व्यावसायिक शिक्षणामध्ये कलाही येत होती. त्यामध्ये संगीत–गीत, नृत्य व वाद्य यांचा उल्लेख करावा लागेल. पञ्चतन्त्रकाळात संगीत विद्या तसेच इतर विद्यांची परंपरा होती. आचार्य विष्णुशर्माच्या काळात मनोरंजनाच्या दृष्टिकोनातून या कलांना महत्त्व होते. पञ्चतन्त्रातील अनेक उल्लेखावरून असे म्हणता येईल की त्या काळात संगीतकला चरमोत्कर्षावर होती. याचे दुसरे नाव गांधर्वविद्या असेही होते.

त्याशिवाय पञ्चतन्त्रात इतर कलांचाही उल्लेख आला आहे. त्यामध्ये उपयोगी कला आणि ललित कला असा भेद करता येईल. उपयोगी कलेमध्ये लोहार, सोनार, विणकर, रथकार, कुंभकार इत्यादींचा उल्लेख ग्रंथात आला आहे. ललित कलेत वास्तुकला, मूर्तिकला, संगीतकला, चित्रकला, काव्यकला इत्यादी येतात. या ग्रंथात संगीतकलेविषयी उल्लेख आला आहे आणि इतर कलांचा उल्लेख शब्द विशेष म्हणून करण्यात आला आहे. इतर कलांमध्ये क्रीडा इत्यादींचा उल्लेख करता येईल. यावरून असे समजते की मनोरंजनाच्या दृष्टीने त्या काळात अनेक क्रीडांना महत्त्व होते.

पञ्चतन्त्रात राज्यशास्त्राबद्दल तात्विक विचार आले आहेत. लेखकांनी कथामुखम् मध्ये कथेचा आरंभ करीत दाक्षिणात्य जनपदातील महिलारोप्यचा राजा अमरशक्तिविषयी सांगितले आहे. त्यामध्ये आलेल्या उल्लेखांवरून राजामध्ये असलेल्या गुणांचा बोध होतो. पञ्चतन्त्रकारांना राजासाठी स्त्री सन्निध्य प्रिय नव्हते. यावरून हे स्पष्ट होते की प्राचीन धर्मशास्त्रज्ञांना आणि अर्थशास्त्रज्ञांना राजाबद्दल मान्य असलेले सर्व गुण आचार्य विष्णुशर्मा यांना मान्य आहे.

पञ्चतन्त्राचे लेखक विष्णुशर्मांनी अमरशक्ति राजाने आपल्या मुर्ख पुत्राच्या शास्त्रविमुखतेने खिन्न होवून मंत्र्यांना बोलावून त्यांच्याशी चर्चा केली आहे. यावरून असे सिद्ध होते की अशा विषयाच्या चिंतनात केवळ सचिवच महत्त्वाचा नव्हता तर संपूर्ण परिषदेला विशेष महत्त्व होते. तसेच राजाचे सचिव विद्वान आणि अपेक्षित गुणांनी युक्त होते. सचिवांना त्याकाळी विशेष महत्त्व होते हे अनेक उल्लेखांवरून सिद्ध होते.

पञ्चतन्त्र काळात राष्ट्राला महत्त्व होते. योग्य राजा बनून राष्ट्र सुरक्षित व समृद्ध करण्यासाठी

आपले पुत्र शिक्षित झाले पाहिजे असे राजाला वाटते.

तसेच दुर्ग, कोष, धनाचे महत्त्वही या ग्रंथात सांगण्यात आले आहे. राज्याच्या सप्तांगाच्या विवेचनातून असे म्हणता येईल की राजाच्या यशासाठी सातही अंग शरीराच्या अंगाप्रमाणे अत्यंत महत्त्वाचे आहे. षाड्गुण्यामध्ये सन्धि, विग्रह, यान, आसन, द्वैधीभाव, समाश्रय हे होत. आचार्य विष्णुशर्मांना षाड्गुण्य नीति मान्य होती. पञ्चतन्त्रात उपायांचाही उल्लेख करण्यात आला आहे. लेखकांनी सामादि उपयांच्या राजनैतिक महत्त्वाचा स्वीकार केला आहे आणि त्याची व्यावहारिक बाजूही सांगितली आहे. पञ्चतन्त्रातील मंगलाचरणात नयशास्त्रज्ञांना नमस्कार करीत राजनीतिचे महत्त्वही सांगितले आहे. शास्त्रज्ञान रहीत आणि विवेक-शून्य व्यक्ती एक सामाजिक अभिशाप आहे. राजनीतिच्या शास्त्रीय आणि प्रयोगात्मक ज्ञानात शून्य असलेला शासक वर्ग राष्ट्राला घातक ठरतो.

जीवनाच्या यशस्वितेसाठी धर्म संचय करण्याचा सल्ला देते. दुष्कर्मामध्ये मग्न असलेल्या मनुष्याला त्या पापापासून मुक्ति मिळविण्यासाठी या ग्रंथात प्रायश्चित्त व्यवस्था सांगितली आहे. अनेक उल्लेखांवरून असे समजते की या ग्रंथात धर्माचे पालन करणे महत्त्वाचे मानले आहे. त्या काळात धर्म, अर्थ, काम आणि मोक्ष निमित्त कर्तव्य निश्चित होते.

पञ्चतन्त्रकाळातील लोकांचे कौटुंबिक जीवन संघटित आणि सुखी होते. संयुक्त कुटुंब होते. कुटुंबातील मुख्य व्यक्ति संचालक आणि संरक्षक होता. माता, पुत्र, पुत्री सर्वांना स्नेह आणि आदर मिळत होता. धर्मशास्त्रकारांनी सांगितलेल्या व्यवस्थेनुसार पैतृक संपत्तीवर सर्वांचा अधिकार होता.

या ग्रंथात सामाजातील उपष्टम्भकारी घटकांचाही उल्लेख आला आहे. येथे उपष्टम्भकारी घटक म्हणजे चोर, धूर्त, ठग, द्युत खेळणारा इत्यादी होय. प्रत्येक काळात अशा घटकांचे अस्तित्व असते. एखाद्या काळात त्यांचा प्रसार आणि प्रभाव अधिक असेल तर काही काळात तो कमी असेल. पञ्चतन्त्रकाळातील समाजात अशा लोकांची अधिकता होती.

पञ्चतन्त्र ग्रंथात आलेल्या उल्लेखांवरून असे म्हणता येईल की तत्कालीन समाजात स्त्रीला प्रतिष्ठा होती. स्त्री ही पूजनीय आणि अवध्या होती. परंतु ही धारणा सच्चरित्र स्त्रियांसाठीच होती. अकुलीन स्त्रियांसाठी नव्हती. पुंश्चलीला धूर्त, अविश्वसनीय, मायाविनी इत्यादी रूपांमध्ये जाणले जात होते. त्यांचे महत्त्व केवळ वासनेच्या तृप्तिपुरतेच मर्यादित होते. कुलीन स्त्रियांप्रमाणे त्यांना प्रतिष्ठा मिळत नव्हती. वैदिक काळात आणि स्मृति काळात स्त्रीला समाजात प्रतिष्ठा होती. परंतु तत्कालीन समाजात स्त्रियांच्या सामाजिक, नैतिक मुल्यांचा ऱ्हास

झाला होता. समाजात पुंश्चली स्त्रियांची अधिकता होती. स्त्रियांची वासनात्मक, नीच प्रवृत्ति पाहून तिची निंदा केली आहे. पञ्चतन्त्रात स्पष्ट शब्दात स्त्रियांचे काही स्वाभाविक दोष सांगितले आहेत. ते दोष म्हणजे-असत्यभाषण, धाडस, माया, मूर्खता, लोलुपता, अपवित्रता आणि निर्दयता होत. पञ्चतन्त्राने चरित्रभ्रष्ट असलेल्या स्त्रीची निंदा केली आहे.

पञ्चतन्त्र हा ग्रंथ तत्कालीन भारतीय सामाजिक व सांस्कृतिक व्यवस्थेचे चित्रण करते. म्हणून हा ग्रंथ सामाजिक आणि सामाजिक दृष्टीने महत्त्वाचा ग्रंथ आहे.

तत्कालीन समाजातील आर्थिक स्थिती काहीशी खालावलेली असावी. अर्थाचे महत्त्व सर्वांना मान्य होते. धन कमविण्यासाठी वेगवेगळे व्यापारच मुख्य साधन होते. हे व्यापार स्वदेशात किंवा परदेशात केले जात असे. अर्थ संचयात अनर्थही होत असे. धनासाठी महती तृष्णा असूनही त्यागाची भावना होती. कृषि, पशुपालन आणि व्यापार हे तिन्ही उपजीविकेचे मुख्य साधन होते.

पञ्चतन्त्रात व्यापाराचे महत्त्व सांगितले आहे. त्याकाळात सुगन्धित द्रव्य, सावकारी, भांडे विकणे, मांस विकण्याचा व्यापार केला जात असे. या ग्रंथात आयात-निर्यातीचाही उल्लेख मिळतो आणि इतर व्यापाराबद्दलही सांगितले आहे.

एखाद्या देशाची सभ्यता, संस्कृति ही त्या देशाच्या भौगोलिक स्थितीवर अवलंबून असते. पञ्चतन्त्रात राजनैतिक घटकांची अधिकता असली तरी नदी, पर्वत, वन, समतल भूमि, नगर, जनपद आणि जीवजन्तुंचा उल्लेख आला आहे. यावरून तत्कालीन भौगोलिक स्थितीचीही माहिती मिळते. या सर्व उल्लेखावरून असे म्हणता येईल की पञ्चतन्त्र हा ग्रंथ सामाजिक, सांस्कृतिक, आर्थिक, भौगोलिक दृष्टीने महत्त्वाचा ग्रंथ आहे.

कथासरित्सागर संस्कृत कथा साहित्यात अत्यंत लोकप्रिय ग्रंथ आहे. हा ग्रंथ केवळ ऐतिहासिक दृष्टिनेच महत्त्वाचा नाही तर साहित्यिक दृष्टीनेही तो महत्त्वाचा आहे.

सोमदेवांच्या हृदयात देशाबद्दल प्रेम होते. रमणीय अशा काश्मिरचे वर्णन त्यांनी केले आहे. त्यांनी कश्मीरला पृथ्वीचा शिरोमणि मानला आहे.

सांस्कृतिक अध्ययनासाठी कथासरित्सागर हा ग्रंथ अत्यंत महत्त्वाचा आहे. भारतीय संस्कृतिच्या सर्वच घटकांचे उद्घाटन सोमदेवांनी कथासरित्सागर ग्रंथात केले आहे. तत्कालीन धार्मिक स्थितीचे आणि धार्मिक स्थळांचा उल्लेखही या ग्रंथात आला आहे. भारतीय स्त्रियांची स्थिती, जाती-व्यवस्था, कला आणि स्थापत्य, सामाजिक, आर्थिक, राजनैतिक, भारतीय दरबार, राजपूत, द्युत-क्रीडा, मदिरालय इत्यादी सर्व सांस्कृतिक तथ्यांचे वर्णन

कथासरित्सागर ग्रंथात आले आहे. भारतीय संस्कृतिच्या सम्यक ज्ञानासाठी कथासरित्सागराचे अध्ययन करणे आवश्यक ठरते.

कथासरित्सागर ग्रंथात चीनी रेशमी वस्त्र (चीनांशुक) चे वर्णन मिळते. तत्कालीन साहित्य आणि मुद्रा त्या काळातील सामुद्रिक व्यापार आणि द्वीपान्तर गमनाविषयी महत्त्वाची माहिती देतात. सार्थवाहांचे व्यापारानिमित्त देशान्तर भ्रमण भारताला केवळ संपन्नच बनविले नाही तर हिंदू धर्म आणि संस्कृतिचाही प्रसार झाला. त्यामुळे काही विदेशी सांस्कृतिक तत्त्वही इथे आले. त्यांचा परिणाम भारतावरही झाला.

जाती आणि व्यवसायाच्या बाबतीतला उल्लेख या ग्रंथात आला आहे. समाजात वर्णव्यवस्था प्रचलित होती. नवीन जाती आणि उपजाती निर्माण होत होत्या. जाति-व्यवसायासंबंधी शिथिलता काही उदाहरणांवरून लक्षात येते. ब्राह्मणातच क्षात्र ब्राह्मण, वैश्य ब्राह्मण, शूद्र ब्राह्मण आणि निषाद ब्राह्मणांचा उल्लेख आला आहे.

कथासरित्सागराच्या अध्ययनातून वणिकांच्या द्वीपान्तर यात्रेच्या विषयावर प्रकाश पडतो. या ग्रंथात द्विपाचा उल्लेख आला आहे. तसेच इतर द्विपांशीही व्यापाऱ्याचे व्यापारिक संबंध होते. त्यात कर्पूरसंभवद्वीप, कटाहद्वीप, सिंहलद्वीप, सुवर्णद्वीप, श्वेतद्वीप, नारिकेल द्वीपांचा उल्लेख आला आहे. यातून कथासरित्सागरकालीन अन्तर्राष्ट्रीय व्यापाऱ्याच्या प्रगतिचे अनुमान सहज लावता येते.

द्वीपान्तर यात्रेच्यावेळी कठीण मार्गांचा उल्लेख सोमदेवांनी केला आहे. भारतातील मोठ-मोठ्या अन्तर्राष्ट्रीय व्यापारी संबंधात भारत-चीन व्यापाराचा उल्लेख मिळतो. अनेक चीनी व्यापाऱ्यांनी भारतात चीनी घोडे आणि विविध प्रकारचे चीनी कपडे आणले. चीनांशुकाचा उल्लेख प्राचीन साहित्यात मुख्य वस्त्राच्या रूपाने आला आहे.

या काळात नवीन जातीची निर्मिती झाली होती. तिला कायस्थ असे म्हणले गेले. त्यांचे मुख्य कार्य लेखन किंवा लिपिकाचे होते. ते लिपिकाशिवाय खाते लिहिणे, तसेच इतर प्रशासनिक कार्यात मदत करीत होते. ते शासकाचे सेवक होते. राजाज्ञाचे पालन करीत होते.

कथासरित्सागराच्या अध्ययनातून तत्कालीन शिक्षण पद्धती, स्वरुप यावरही प्रकाश पडतो. विद्यार्थ्यांना शिक्षण निःशुल्क दिले जात होते. श्रवण आणि पठण पद्धतीने अध्ययन होत होते. विद्येच्या प्राप्तिसाठी बाह्याडंबराची कटू निंदा केली आहे. व्रत आणि उपवास इत्यादीने विद्या प्राप्त करणे म्हणजे सशाच्या शिंगाप्रमाणे असंभव आणि आकाशात चित्र काढल्याप्रमाणे व्यर्थ समजले जात होते. अक्षर ज्ञान अध्ययनासाठी महत्त्वाचे मानले गेले.

तत्कालीन समाज ज्योतिष शास्त्रावर विश्वास ठेवत होता. तसेच खगोल शास्त्रज्ञांनाही मान होता. शल्य-चिकित्साही लोकप्रिय होती.

या ग्रंथात राजाच्या चारित्रिक दुर्बलतेविषयी महत्त्वाची माहिती मिळते. राजाचे नापितच्या स्त्रीशी रममाण होण्याची कथा आहे.

उत्कोच (घूस, लाच) आणि भ्रष्टाचार निश्चितच पतनोन्मुख शासकाचे लक्षण आहे. या ग्रंथाच्या माहितीच्या आधारे तत्कालीन प्रशासनाच्या भ्रष्ट स्वरुपाची माहिती मिळते. उत्कोच हे असे अमोघ अस्त्र होते की त्यासमोर प्रशासकीय यम-नियम आणि विधान महत्त्वहीन वाटत होते. लोभी कर्मचाऱ्यांसाठी लाच एकमात्र अचूक औषधि समजली जात होती. याच्या लोभाने सेवकातही फूट पाडली जात असे. लाच देऊन कायस्था (प्रशासकीय लेखाधिकारी) कडून मनोवाच्छित राज्यादेश लिहून घेतल्याचा उल्लेख या ग्रंथात केला आहे. तसेच या कर्मचाऱ्यांशिवाय मंत्र्यांनीही उत्कोच घेतल्याचा उल्लेख आहे.

कथासरित्सागरात अनेक ठग व्यापाऱ्यांचा उल्लेख मिळतो. हे व्यापारी बहु-शुल्क (चुंगी) न देता आपले वाहन योग्य रस्ता सोडून आडमार्गाने नेत असत. त्यामुळे राज्याला वित्तहानी होत असे. या ग्रंथाच्या अध्ययनातून स्त्री-चरित्रावरही प्रकाश पडतो. तसेच देवदासींचाही उल्लेख यात मिळतो.

तत्कालीन समाजात संगीतकलाही नागरिकांना प्रिय कला होती. गीत-गायनासोबत वाद्यही वाजवले जात असे. संगीताच्या माध्यमातून श्रीमंत लोक आपले मनोरंजन करीत असे. सरस्वतीची आराधना केली जात. उच्च कुलामध्ये संगीताचे शिक्षण योग्य गांधर्व शिक्षकांद्वारे दिले जात असे.

कथासरित्सागर ग्रंथात आलेल्या उल्लेखांनुसार चित्रकला ही प्रगतिशील स्थितीत होती. भिंतीवर चित्र काढण्याची प्रथा होती.

सोमदेवांनी भारताचे समृद्ध रूप प्रस्तुत केले आहे. त्यादृष्टीने कथासरित्सागर भारतीय जीवनाचे चलचित्र आहे. भारताचे अति समृद्ध चित्र संस्कृत साहित्यातील काव्य, नाटक, चम्पू आणि कथा साहित्यातून मिळते. या ग्रंथात चित्र, चित्रपट, भित्तिचित्र (चित्रभित्तिषु), चित्रशाला आणि चित्रकाराविषयी महत्त्वाची माहिती मिळते.

लहान मुले काष्ठ निर्मिती भातुकली आणि वेगवेगळे यांत्रिक खेळणे बनवून मनोरंजन करीत होती.

अशा प्रकारे कथासरित्सागर हा ग्रंथ सांस्कृतिक, सामाजिक संशोधनाच्या दृष्टीने महत्त्वाचा

ग्रंथ आहे.

## १.३ संशोधनाची व्याप्ती

१. हे संशोधन कार्य हितोपदेश, पञ्चतन्त्र आणि कथासरित्सागर या ग्रंथात आलेल्या संवादापुरते व यात आलेल्या विषयांपुरते मर्यादित राहिल.

२. हितोपदेश, पञ्चतन्त्र आणि कथासरित्सागर पुस्तकांवरील अनेक टीका व भाष्यग्रंथांचा आढावा देखील वरील केंद्रबिंदूच्या कक्षेत असेल.

## १.४ संशोधनाच्या पद्धती

हितोपदेश, पञ्चतन्त्र आणि कथासरित्सागर पुस्तकांशी संबंधित असणाऱ्या सामग्रीचे, अवतरणांचे संकलन केले जाईल. नंतर विषयवार वर्गीकरण करून, संशोधनाची उद्दिष्ट्ये या संदर्भात विषयाची मांडणी तर्कशुद्ध पद्धतीने केली जाईल. तथ्यशोधनात्मक स्वरूपाचे हे संशोधनकार्य आहे. मांडणीच्या व आकलनाच्या सोयीसाठी गरजेनुरूप विश्लेषण तर्कपद्धतीचा अवलंब करून निष्कर्ष मांडला जाईल.

## १.५ संशोधनाची उद्दिष्ट्ये

कथांच्या माध्यमातून मानवी मूल्ये रूजविणे, मनुष्यास व्यवहार चतुर बनविणे, सदाचार समजावून धूर्तांच्या धूर्ततेचा परिचय करून देणे, धैर्यशिलता अंगी बाळगणे, प्रसंगावधानानुसार वागणे, दूरदर्शी असणे, जिज्ञासू वृत्ती बाळगणे, धाडशीवृत्ती (साहस) असणे, शुद्ध चारित्र्य जोपासणे हे सर्व पशु-पक्ष्यांना पात्र बनवून या उद्दिष्टांची पूर्ति केली आहे. जेंव्हा पशु-पक्षी बुद्धिमत्ता दाखवतात, दयाळू आणि दानी होतात, तेंव्हा मनुष्याने तर तसे वर्तन करणे अपेक्षितच आहे.

हितोपदेश या ग्रंथाच्या रचनेचा उद्देश ग्रंथातील नैतिक उपदेश जाणून घेणे हा होय.

पञ्चतन्त्राच्या रचनेचा उद्देश तत्कालीन ऐतिहासिक परिस्थितीनुसार राजनीतिच्या व्यावहारिक पक्षांचे प्रतिपादन करणे आहे. या ग्रंथात तत्कालीन राजनीतिचे वर्णन केले आहे. राजनीतिच्या सिद्धांतांना पशु-कथांच्या माध्यमातून प्रकाशात आणले आहे. तसेच तत्कालीन वंशानुगत सामन्ततंत्रात राज्याचा उत्तराधिकारी अनेक वेळा अशिक्षित किंवा अर्धशिक्षित राजकुमाराच्या हाती येत असे. कोणत्याही राज्यासाठी असा उत्तराधिकारी सुरक्षित नसतो. मग अशा राजनैतिक क्षतिला भरण्यासाठी काही सोपे आणि लोकप्रिय साहित्य प्रकाशात आणणे आवश्यक झाले होते. पञ्चतन्त्राच्या रचनेचा उद्देश याच राजनैतिक आणि सामाजिक आवश्यकतांची पूर्ती करणे आहे. आणि हा ग्रंथ या उद्देशात यशस्वी राजनैतिक कथा ग्रंथ म्हणले जावू शकते. या

गुणामुळेच या कथाग्रंथाने भारत आणि भारताबाहेरही प्रसिद्धि मिळविली आहे.

पञ्चतन्त्राचा उद्देश अल्पज्ञ बालकांना राजनैतिक सिद्धान्ताचे शिक्षण देणे असे सांगितले आहे. प्राचीन राज्यशास्त्र आणि धर्मशास्त्रकारांचे या ग्रंथावर प्रभाव होता.

हा ग्रंथ राजनैतिक विचारांचा लोकप्रिय कोष म्हणता येईल. ग्रंथाच्या रचनेचा मूळ उद्देश राजनीति शास्त्राचे ज्ञान करवून देण्यासाठीच होते. राजनीतिचा मार्ग सरळ असत नाही. हा ग्रंथ व्यावहारिक ज्ञान आणि राजनैतिक सारगर्भित सिद्धान्तांनी भरलेले आहे.

हा ग्रंथ नृपति वर्ग आणि त्याच्या शासक वर्गाच्या राजनैतिक जीवनाच्या व्यावहारिक आचरणाची आचारसंहिता आहे. तसेच हा एक कथासंग्रही आहे. या ग्रंथाचा प्रतिपाद्य विषय पशु-पक्ष्यांच्या माध्यमातून नैतिक, व्यावहारिक शिक्षण देणे होय.

ग्रंथातील पाचही तंत्र मानवी जीवनातील विविध व्यावहारिक व राजनैतिक पक्षांचे प्रतिपादन करतात. या कथा पशु-पक्षांच्या माध्यमातून सांगण्यात आल्या आहेत. नैतिक, धार्मिक आणि दार्शनिक विचारांपेक्षा कथाग्रंथात नीति व जीवनातील सामान्य नियमांशी संबंधित गोष्टींवर प्रकाश टाकण्यात आला आहे. त्यादृष्टीने हा ग्रंथ व्यावहारिक, राजनैतिक शिक्षण देणाऱ्या कथा-साहित्यात प्रातिनिधिक रचना आहे. या ग्रंथातून राजनैतिक व व्यावहारिक ज्ञान मिळते. ग्रंथाचा उद्देश राजनीति आणि जीवनातील सामान्य नियमांशी मानवांना सुसज्जित करणे आहे. कुळाचे सर्वप्रकारे रक्षण केले पाहिजे असे म्हणून ग्रंथकारांनी आज आणि पुढे होणाऱ्या पिढीला नैतिक दायित्वाचा उपदेश केला आहे.

आज समाज छिन्न-भिन्न होत आहे. सारहीन समजले जाणारे सामान्य जन एकत्र येवून समाजाला अजेय बनविण्याची गरज आहे. जसे लेखक पंधराव्या कथेत सांगतात की सारहीन वस्तुंचे एकत्रीकरण अजिंक्य असते, तृणांनी बनवलेली दोरी हत्तीला बांधू शकते.

त्या काळातील विद्वान शिक्षक अर्थलिप्सु किंवा स्वार्थी नव्हते. शिक्षकांची त्यागी वृत्ती, योग्यता, साधना आणि समाजाचे हित साधण्याची वृत्ती या ग्रंथातून दिसून येते. आधुनिक शिक्षक वर्गाला या ग्रंथातून उपदेश मिळतो. यावरून असे लक्षात येते की, धर्मशास्त्रकाळाचा प्रभाव त्या काळातील शिक्षक आणि शिक्षणावर होता.

जीवनातील ऐहिक व सुखाचे मूळ-धर्म, अर्थ, काम आणि मोक्षाबद्दलचे विचार यात सहजतेने समाविष्ट करण्यात आले आहेत.

या ग्रंथाच्या अध्ययनावरून असे म्हणता येईल की लेखक विष्णु शर्मा यांनी आपल्या या कथा ग्रंथात धार्मिक, आर्थिक, राजनैतिक आणि व्यावहारिक या सर्व विषयांचे विवेचन मोठ्या

कुशलतेने केले आहेत.  त्यांची ही रचना आजच्या समाजातील लोकांनाही उपयोगाची आहे.

अधीते य इंद नित्यं नीति शास्त्रं श्रृणोतिच ।
न पराभवमाप्नोति शक्रादपि कदाचनः।।

कथारसित्सागर ग्रंथाच्या अध्ययनातून तत्कालीन सांस्कृतिक, भौगोलिक घटकांचे अध्ययन केले जाईल.

**१.६ गृहीतके**

भारतीय समाज हा प्राचीनतम समाज आहे.  तो प्राचीन काळापासून ते आजतागायत मुल्याधारित राहिलेला आहे.  मूल्य ही शाश्वत आणि चिरंतन असतात.  ती मानवाला चांगले जीवन जगण्यासाठी मार्गदर्शन करीत असतात.  आज मानव त्या मुल्यांविषयी आस्थावान आहे.  आणि भविष्यकाळातही राहील.  तसेच एखाद्या देशाची सभ्यता ही तेथील सांस्कृतिक, सामाजिक, राजनैतिक घटकांवर अवलंबून असते.

**१.७ प्रकरण योजना**

अध्याय विषयाच्या अभ्यासाला योग्य दिशा मिळावी यासाठी विषयाची मांडणी प्रकरणामध्ये करण्यात आलेली आहे.

**प्रकरण दुसरे**

**कथासाहित्य आणि नीतिकथा**

**(कथासाहित्याची उत्पत्ती, विकास, प्रकार, नीतिकथेचे हेतू, स्वरूप, महत्त्व, विशेषता)**

या प्रकरणात कथासाहित्याची उत्पत्ती आणि विकास आणि प्रकार तसेच नीतिकथेचे हेतू, स्वरूप, महत्त्व, विशेषता सांगितले आहे.

**प्रकरण तिसरे**

**''हितोपदेश, पञ्चतन्त्र आणि कथासरित्सागर या ग्रंथांचा परिचय आणि महत्त्व''**

या प्रकरणात हितोपदेश, पञ्चतन्त्र आणि कथासरित्सागर या ग्रंथांचा परिचय आणि महत्त्व सांगण्यात आले आहे.

**३.१. हितोपदेश – परिचय आणि महत्त्व**

हितोपदेश हा नीतिकथा साहित्यातील महत्त्वाचा ग्रंथ आहे.  बंगालचा राजा धवलचंद्राचा आश्रित कवी नारायण पंडिताने या ग्रंथाची रचना केली.  याचा मूळ आधार ग्रंथ पञ्चतन्त्र आहे.  याचा स्वीकार स्वतः कवीने केला आहे.

'पञ्चतन्त्रात् तथाऽन्यस्माद् ग्रन्थादाकृष्य लिख्यते ।' (हितोपदेश, कथामुखम्, श्लोक ९,

पृ.५)

हितोपदेशात अनेक कथा आहेत. हा ग्रंथ मित्रलाभ, सुहृदभेद, विग्रह आणि सन्धि नावाच्या चार भागांमध्ये विभागले आहे. हा ग्रंथ उपदेशात्मक आहे. लेखकाने लोकहिताच्या इच्छेने या ग्रंथाची रचना केली आहे. त्यांनी मानवी जीवनाला सार्थक बनविण्यावर भर दिला आहे. त्यांचा हेतू लोकांना हितकारी उपदेश करणे हा आहे. आणि त्यांनी या नैतिक उपदेशांना सहजतेने सांगण्यासाठी कथांना माध्यम बनविले. हा ग्रंथ ज्ञानात्मक आणि मनोरंजनात्मक आहे. व्यावहारिक ज्ञान, मित्रभेद, प्रशासन सामाजिक कर्तव्य आणि नैतिकतेचे ज्ञान सहजतेने यातून मिळते. या ग्रंथात मानवाशिवाय पशु-पक्षीही पात्र आहेत.

या ग्रंथातून राजनीतिचे आणि लोकव्यवहाराचे ज्ञान मिळते. हितोपदेशाचे महत्त्व सांगत असता असे म्हणता येईल की -

श्रुतो हितोपदेशोऽयं पाटवं संस्कृतोक्तिषु ।
वाचां सर्वत्र वैचित्र्यं नीतिविद्यां ददाति च ।।
(हितोपदेश, मित्रलाभ, श्लोक २, पृ.१)

या ग्रंथाच्या अध्ययनाने संस्कृत भाषेत प्राविण्य, वाक्पटुता आणि व्यवहार चातुर्य या तीन गोष्टीचा लाभ मंदबुद्धिच्या लोकांनाही होईल. मग जे कुशाग्र बुद्धिचे लोक या ग्रंथाचा अभ्यास करतील तर ते किती प्रवीण होतील हे काही सांगावयास नको.' अशी ग्रंथकर्त्याची प्रतिज्ञा आहे.

## ३.२ पञ्चतन्त्र – परिचय आणि महत्त्व

पञ्चतन्त्राचे लेखक विष्णु शर्मा आहेत. पञ्चतन्त्रातील 'तंत्र' या शब्दाचा अर्थ विभाग किंवा खंड असा होतो. यात नैतिकतेचे ज्ञान देणारे पाच तंत्र आहेत.

मूळ कथेनुसार महिलारोप्य नगरीचा राजा अमरशक्तीच्या तीन मूर्ख पुत्रांना सहा महिन्यात राजनीति पारंगत बनविण्याचे ठरवून विष्णू शर्मांनी पञ्चतन्त्राची रचना केली आणि आपली प्रतिज्ञा पूर्ण केली. या ग्रंथात पाच मुख्य कथा आहेत. प्रत्येक कथेत प्रासंगिक अशा अनेक उपकथा आहेत. प्रत्येक तंत्रात उपदेश दिला आहे. तंत्राचे नाव पुढीलप्रमाणे आहेत.-

**१. मित्रभेद –**

या तंत्रात पिंगलक नावाचा सिंह आणि संजीवक नावाचा बैल या दोघात करटक आणि दमनक या दोघा कोल्ह्यांनी शत्रुत्व निर्माण केले.

**२. मित्रसंप्राप्ति –**

मित्रसंप्राप्तिमध्ये मित्र बनवले पाहिजेत याचे ज्ञान मिळते. कावळा, कासव, हरीण आणि

उंदीर साधनहीन असूनसुद्धा मैत्रीच्या बळावर सुखी राहिले.

**३. काकोलूकीयम्–**

काकोलूकीयम् या तंत्रात शत्रुशी सुद्धा मैत्री करावी आणि नंतर त्यांना फसवून नष्ट करावे. अर्थात संधि–विग्रहाचे ज्ञान यातून मिळते. कावळा हा घुबडाशी मैत्री करतो आणि नंतर घुबडाच्या किल्ल्यास आग लावतो.

**४. लब्धप्रणाशम् –**

या तंत्रात बुद्धिमान बुद्धिच्या बळावर जिंकतो आणि मूर्ख हातात आलेली वस्तू सुद्धा गमावून बसतो हे सांगितले आहे. कथेनुसार माकड आणि मगराची मैत्री होते. मगराच्या पत्नीला माकडाचे गोड हृदय हवे असते. माकड मगराला 'माझे हृदय वृक्षावरच राहिले आहे म्हणून मला किनारी ने' असे म्हणून आपले प्राण वाचवतो. परंतु मगराच्या मूर्खतेमुळे त्याच्या हातात आलेली वस्तू निघून जाते.

**५. अपरीक्षितकारकम् –**

अपरीक्षितकारकम् या तंत्रात जो विचार न करता वागतो तो नंतर पश्चाताप करतो असे सांगितले आहे. कथेतील ब्राह्मणीने आपल्या प्रिय व सापापासून बालकाचे रक्षण करणाऱ्या मुंगुसाने बालकाला मारले आहे असे समजून त्याला मारले. विचार न करता काम केल्यामुळे नंतर तिला पश्चाताप होतो. या ग्रंथात मानवाशिवाय पशु–पक्षी पात्र आहेत. यातील नीति श्लोकरूपात दिले आहे. तर कथा गद्यात आहे. कथामुखाच्या अंती या ग्रंथाचे फळ सांगितले आहे.

'अधीते य इदं नित्य नीतिशास्त्रश्रृणोतिच ।
न पराभवाप्नोति शक्रादपि कदाचन।।'

या ग्रंथात तत्कालीन राजनैतिक घटकांचा उल्लेख मिळतो.

## ३.३. कथासरित्सागर – परिचय

कथासरित्सागर कथा साहित्यातील महत्त्वाचा ग्रंथ आहे. या ग्रंथाचे लेखक पंडित सोमदेव आहेत. त्यांनी त्रिगर्त किंवा कुल्लू–कांगडाच्या राजाची मुलगी आणि काश्मीरचा राजा अनन्ताची राणी सूर्यमती हिच्या मनोरंजनासाठी हा ग्रंथ लिहीला. या ग्रंथात २१३८८ पद्य आहेत. ते १२४ तरंगामध्ये विभागले आहेत. या ग्रंथाचा दुसरा विभाग लंबकांमध्ये आहे. या लंबकांची संख्या १८ आहे. हा ग्रंथ अनेक कथांचा संग्रह आहे. सोमदेवांनी यथार्थच या ग्रंथाला कथारूपी नद्याचे सागर म्हटले आहे. आपल्या ग्रंथाच्या आरंभीच त्यांनी लिहीले आहे.

'बृहत्कथायाः सारस्य संग्रह रचयाम्यहम्।'

आणि शेवटी प्रशस्तित असे म्हटले आहे.

'नानाकथामृतमयस्य बृहत्कथायाः सारस्य सज्जनमनोम्बुधिपूर्णचन्द्रः।
सोमेन विप्रवरभूरिगुणाभिरामरामत्मजेन विहितः संग्रहोऽयम्।।'

अर्थात कथासरित्सागर अनेक कथांच्या अमृताचे खाण असलेल्या बृहत्कथा नावाच्या ग्रंथाचे सार आहे. बृहत्कथा पैशाची भाषेचा ग्रंथ आहे. याची रचना गुणाढ्याने सातवाहन राजाच्या काळात केली आहे.

कथेच्या उत्पत्तीसंबंधी सोमदेवांनी शिव-पार्वती आणि त्यांचे गण पुष्पदंत आणि माल्यवान यांची कथा सांगितली आहे.

लम्बकाचे मूळ संस्कृत रूप लम्भक असे होते. एका विवाहाद्वारा एका स्त्रीची प्राप्ती होणे म्हणजे 'लम्भ' होय. आणि त्याच्या कथेसाठी 'लम्भक' शब्द रूढ झाले. त्यानुसार अलंकारवती लम्बक, शशांकवती लम्बक इत्यादि वेगवेगळे कथांचे नाव पडले. या ग्रंथात एकूण अठरा लम्बक आहेत. त्यांची नावे पुढीलप्रमाणे - कथापीठ, कथामूख, लावाणक, नरवाहनदत्तजन्म, चतुर्दारिका, मदनमंचुका, रत्नप्रभा, सूर्यप्रभा, अलंकारवती, शक्तियशस् वेला, शशांकवती, मदिरावती, पंच, महाभिषेक, सुरतमंजिरी, पद्मावती, विषमशील असे आहेत.

या ग्रंथातून तत्कालीन भारतीय सामाजिक, सांस्कृतिक, राजनैतिक तसेच इतर अनेक घटकांचे दर्शन घडते.

### प्रकरण चौथे

### हितोपदेश, पञ्चतंत्र आणि कथासरित्सागर ग्रंथातील निवडक कथांचा आशय

या प्रकरणात हितोपदेश, पञ्चतन्त्र आणि कथासरित्सागर या ग्रंथातील निवडक कथांच्या आशयाचा उल्लेख येईल.

### प्रकरण पाचवे

### हितोपदेश, पञ्चतन्त्र आणि कथासरित्सागर ग्रंथातील पात्र वैविध्य

या प्रकरणात कथांच्या माध्यमातून मानवी मूल्ये रूजविणे, मनुष्यास व्यवहार चतुर बनविणे, सदाचार समजावून धूर्तांच्या धूर्ततेचा परिचय करून देणे, धैर्यशिलता अंगी बाळगणे, प्रसंगावधानानुसार वागणे, दूरदर्शी असणे, जिज्ञासू वृत्ती बाळगणे, धाडशी वृत्ती असणे, शुद्ध चारित्र्य जोपासणे हे मानव, पशु-पक्षी, देव-देवता, विद्याधर, असुर, वेताळ इत्यादींना पात्र बनवून या उद्दिष्टांची पूर्ती केली आहे.

## ५.१. 'हितोपदेश' ग्रंथातील पात्र वैविध्य

हितोपदेश कथांमध्ये अनेक पशु-पक्षी पात्र आले आहेत. त्यामध्ये कोल्हा, गिधाड, मांजर, कबुतर, उंदिर, वाघ, हरिण, कावळा, हत्ती, कासव, वानर, गाढव, सिंह, साप, ससा, हंस, बगळा, मोर, नकुल इत्यादी पशु-पक्ष्यांचा उल्लेख केला आहे. हे पशु-पक्षी आपल्याला नैतिक शिक्षण देतात.

## ५.२. 'पञ्चतन्त्र' ग्रंथातील पात्र वैविध्य

पञ्चतन्त्रातील पाचही तंत्र मानवी जीवनातील विविध व्यावहारिक व राजनैतिक पक्षांचे प्रतिपादन करतात. या कथा पशु-पक्ष्यांच्या माध्यमातून सांगण्यात आल्या आहेत. ग्रंथात वर्णन करण्यात आलेल्या कथांची ही विशेषता आहे की यात विष्णुशर्मांनी धर्म, अर्थ, कर्म इत्यादि महत्त्वाच्या विषयांना या पशु-कथांच्या माध्यमातून निश्चित नीतिविषयी उद्देशानिमित्त परिवर्तन आणि परिवर्ध्दन करून लोकोपयोगी बनविले आहे. तसेच पशु-पक्षांच्या आचरणातून हा उपदेश सांगितला आहे की कठिण आणि अशक्य कार्य करण्यात जेंव्हा पशु-पक्षी सक्षम आहेत, तेंव्हा बुद्धिसंपन्न असणाऱ्या मनुष्यांसाठी कार्य करणे अशक्य नाही. अशाप्रकारे उत्तम आणि यशस्वी जीवन जगण्यासाठी नैतिक उपदेशांमध्ये पशु-पक्ष्यांच्या माध्यमाचे महत्त्व आहे.

या ग्रंथात मनुष्य आणि पशु-पक्षी हे समाजातील दोन महत्त्वाचे घटक आहेत. कथेतील सर्व पात्र अन्वर्थसंज्ञक आहेत. त्यातील काही नावे गुण दर्शविणारे आहेत. जसे मदोत्कटः सिंह काही नावे स्वभाव आणि रूप दर्शविणारे आहेत. उदा. पिंगलक सिंह, करालकेसर सिंह, त्याचप्रमाणे मानवी पात्रांनाही नाव दिले आहे. जसे जीर्णधन, धर्मबुद्धि तसेच हा ग्रंथ राजनीतिशी संबंधित आहे. त्यामध्ये राजा, मंत्री तसेच सामान्य जनता, इत्यादि पात्र आहेत. कौटुंबिक संबंधात जसे पति-पत्नी, पिता-पुत्र इत्यादि आहेत.

पञ्चतन्त्रातील अनेक कथात ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य, शूद्र इत्यादि पात्र आले आहेत. तसेच स्त्रीपात्रही आले आहेत.

पञ्चतन्त्र मुळात पशु-पक्ष्यांशी संबंधित रचना आहे. हा पशु समुदाय दोन भागांमध्ये विभागला जावू शकतो. ते म्हणजे ग्राम्य आणि वन्य.

ग्राम्य पशुंमध्ये गाय, बैल, महिषी, उंट इत्यादि अनेक पाळीव प्राण्याचा उल्लेख आला आहे. तसेच या ग्रंथात अनेक वन्य पशुंना पात्र बनविले आहे. वन्य पशुंमध्ये सिंह, वाघ, वानर, हत्ती इत्यादि अनेक प्रकारच्या प्राण्यांचा उल्लेख आला आहे.

प्राण्यांचे स्वरूप, स्वभाव व निवासादी चित्रणातून असे समजते की, तत्कालीन जन या

प्राण्यांच्या निकट होते. त्यांचा परस्परांशी संबंध होता. मनुष्य जीविकोपार्जनासाठी किंवा मनोरंजनासाठी प्राण्यांचे पालन करीत होता. ते प्राण्यांच्या मनोवृत्तिला चांगले जाणत होते. म्हणून पशु तत्कालीन जनजीवनातील अभिन्न अंग होते.

मानवी जीवनात पक्ष्यांनाही महत्त्वाचे स्थान आहे. पञ्चतन्त्रकाळातील समाज पक्ष्यांशी परिचित होता. या ग्रंथात अनेक ठिकाणी विविध पक्ष्यांचा उल्लेख मिळतो. काही पक्षी तर कथेचे मुख्य पात्रही आहेत. या उल्लेखित पक्ष्यांमध्ये काक, बक वगैरे अनेक पक्षी आहेत.

या ग्रंथात अनेक जीव–जन्तुंचाही उल्लेख आला आहे. तत्कालीन समाजातील लोकांना या जीव–जन्तूंचे ही ज्ञान होते, त्यांच्याशी ते परिचित होते. यातील काही जीवन मनुष्याचे शत्रु होते तर काही मित्र होते. या जीव–जन्तूंना तीन भागात विभागले आहे. ते म्हणजे जलचर, थलचर आणि नभचर.

जलचरामध्ये मासे, खेकडा वगैरे जीव येतात. थलचरामध्ये उंदीर, साप इत्यादि अनेक जीव येतात. आणि नभचरामध्ये माशी, मधमाशी वगैरेंचा उल्लेख या ग्रंथात आला आहे. हे जीव स्थलावरही राहतात आणि उडतातही.

तत्कालीन समाज जीव–जन्तुच्या स्वरूपाशीच नव्हे तर त्यांच्या समाजाशीही परिचित होता.

### ५.३. 'कथासरित्सागर' ग्रंथातील पात्र वैविध्य

कथासरित्सागरात अनेक कथा संग्रहीत आहेत. द्युलोक आणि पृथ्वीच्या निर्माणासंबंधी, ऋग्वेदकालीन कथाही आहेत. त्याचप्रमाणे रक्तपात करणाऱ्या वेताळांची कथा, प्रेमकथा तसेच देवता, मनुष्य आणि असुरांच्या युद्धाच्या कथा इथे संग्रहित आहेत.

या ग्रंथात अद्भूत कथा आणि त्यांचे धाडसी प्रेमी, राजा आणि नगर, राजतन्त्र आणि षडयंत्र, रक्तपात, वेताळ, पिशाच, यक्ष आणि प्रेत, पशुपक्ष्यांच्या कथा तसेच भिकारी, साधु, दारू पिणारे, वेश्या, विट आणि कुंटीणी यांच्या कथा आल्या आहेत. या ग्रंथात मूर्खांच्याही अनेक कथा आल्या आहेत. तसेच धूर्त, शठ, द्युत खेळणारे इत्यादिंच्याही कथा आल्या आहेत. तसेच स्त्रीपात्रही आले आहेत. त्याला दुःश्चरित्र स्त्रीच्या कथा आणि साध्वी स्त्रियांच्याही कथा संग्रहीत आहेत. गृहिणी, वेश्या इत्यादिंचाही उल्लेख आला आहे.

सोमदेव मूळ शैव भक्त होते. आणि कथासरित्सागर शिव आणि पार्वतीच्या स्तुतिंचा ग्रंथ आहे. या ग्रंथात भूत–प्रेताच्या अनेक कथा संग्रहीत आहेत. पिशाच्यांच्या कार्याचा उल्लेख करण्यात आला आहे. शिवाची स्तुति देवाधिदेवाच्या रूपात केली आहे. तसेच इतर देवतांचाही उल्लेख आला आहे.

नागरिकांच्या मनोरंजनासाठी एक प्रिय साधन म्हणून पशुपक्षीपालन केले जात असे. स्त्रिया आपल्या मनोरंजनासाठी पक्ष्यांचे पालन करीत होती. संस्कृत साहित्यात मानिनीला हसविण्यासाठी आणि कधी संदेशवाहकाच्या रूपात पशु-पक्ष्याचे वर्णन मिळते. जर पशु-पक्ष्यांना संस्कृत साहित्यातून काढले तर ते साहित्य निर्जीव होवून जाईल.

## प्रकरण सहावे

## हितोपदेश, पञ्चतन्त्र आणि कथासरित्सागर ग्रंथातील मूल्यांचा अभ्यास.

या प्रकरणात राजकीय, धार्मिक, मानवी मूल्यांचा अभ्यास करणार आहोत. या मूल्यांमध्ये विद्येची महती, उत्तम संतति, धर्म, उद्योगशिलता, पराक्रम, सज्जनांची संगत, गुणज्ञ, विद्वान व्यक्ती, वाईटाची संगत, दानशीलता, दुर्जन व्यक्ती, धनाचे महत्त्व, धैर्यशिलता, अतिथी सत्कार, तसेच राजाचे गुण, मंत्र्याचे गुण, सेवकाचे गुण, युद्धनीति, मूर्ख व्यक्तीचे लक्षण, स्त्रियांचे चरित्र इत्यादी बाबतीतील मुल्यांचा उल्लेख होईल.

### ६.१. 'हितोपदेश' ग्रंथातील मूल्ये

हितोपदेश ग्रंथात अनेक मुल्यांचा उल्लेख करण्यात आला आहे.

### ६.२. 'पञ्चतन्त्र' ग्रंथातील मूल्ये

पञ्चतन्त्र नीतिकथा साहित्याचा एक मनोरंजक ग्रंथ आहे. भारतात नीतिकथांचा उगम ऋग्वेदापासून दिसून येतो. अनेक प्रकारच्या कथा वेदात मिळतात. ब्राह्मणग्रंथातही अनेक कथा आल्या आहेत. पुराणसाहित्य आणि महाभारतातील शांतिपर्वात सुद्धा पशु कथांचे विकसित रूप मिळते. रामायणातही अनेक कथा आल्या आहेत. तसेच श्रीमद्भागवत पुराण, बौद्ध साहित्य, जैन साहित्यातही अनेक कथांचा उल्लेख आहे. यावरून हे स्पष्ट होते की समग्र भारतीय वाङ्मयात अशा प्रकारच्या कथा उपलब्ध आहेत.

या ग्रंथातील नीतिवचन धार्मिक, दार्शनिक विचारांशी संबंधित तर आहेतच शिवाय राजनैतिक आणि जीवनातील सामान्य नियमांशीही संबंधित आहेत. धर्म म्हणजे धारण करणे होय. 'धारणाद् धर्ममित्याहुधर्मो धारयते प्रजाः।' भारतीय धर्मशास्त्रकारांनी धर्माचे पुढील प्रकार केले आहेत. देशधर्म, कुलधर्म, जातिधर्म, वयोधर्म, गुणधर्म, शरीरधर्म, आपद्धर्म. येथे देशमर्ध म्हणजे प्राचीनतम ऋषिद्वारे अनुष्ठीयमान तपाशी आहे. यात सत्याचे पालन करणे येते. अपरीक्षितकारमध्ये चार ब्राह्मणांच्या कथेत सत्याचे पालन करणे महत्त्वाचे सांगितले आहे. दर्शन म्हणजे जीवनातील कठीण समस्येवर तर्कपूर्वक विचार करणे होय. पञ्चतन्त्रात अशाप्रकारचे दार्शनिक विचार ठिकठिकाणी मिळतात. त्यामध्ये दुःखाचे कारण आणि त्याच्या निवारण्याच्या

उपायांवर विचार केला आहे.

नीतिविषयी उपदेशाचे पञ्चतन्त्र एक कोषच आहे. या ग्रंथातील नैतिक विचार आणि अभिव्यक्ति खोलवर प्रभाव टाकणारे आहेत. प्राचीन भारतीय शिक्षणात नैतिकतेवर विशेष भर दिला आहे. त्यात सत्य, अहिंसा, सेवा, निर्भयता, स्वावलम्बन, अध्यवसाय, आत्मसंयम, निर्लोभिता इत्यादि येतात.

पञ्चतन्त्रकाळात सत्त्याला महत्त्व होते. 'सत्त्यं ब्रुयात' या सिद्धांतावरही विशेष भर दिला आहे. भारतीय जीवनात 'सेवा धर्म परमगहनो योगिनामेभ्य गम्यः' अर्थात सेवा धर्म योग्यांसाठी दुर्लक्ष आहे. असे सांगत पञ्चतन्त्रात शरणागत शत्रुचीही सेवा केली पाहिजे' असे सांगितले आहे. चांगले जीवन व्यतित करण्यासाठी मनुष्यामध्ये निर्भयता असणे आवश्यक आहे. पञ्चतन्त्रकारांनी येथे श्रीमद्‌भगवत्‌गीतेतील वचन सांगत म्हटले आहे की जे विद्वान असतात ते मरणारे आणि जगणाऱ्यांविषयी विचार करीत नाहीत. मानवी जीवनात स्वावलम्बनाला विशिष्ट महत्त्व आहे. याविषयी असे म्हणणे योग्य ठरेल की आचार्य विष्णुशर्मांनी उद्योगाचा जो उपदेश केला आहे तो स्वावलंबनाचा एक भाग आहे. आळस स्वावलम्बनाला बाधक आहे. त्यामुळे आळसाचा त्याग केला पाहिजे. अशाप्रकारचे नैतिक नियम त्याकाळी मान्य होते. कष्टांची भावना जीवनात आत्मविश्वास निर्माण करून शुद्ध संकल्पांचा विकास करते. हे राजा अमरशक्तिच्या इच्छा शक्तिचा परिणाम होता की त्याचे मूर्ख पुत्र विष्णुशर्माच्या प्रयत्नाने सहा महिन्याच्या आत नयशास्त्राचे विद्वान बनले. पञ्चतन्त्र अशा अनेक दृष्टान्तांनीयुक्त कथांचा कोष आहे. मानवी जीवनात इंद्रिय संयम सिद्धिसाठी आवश्यक आहे. पञ्चतन्त्रात दमनक नावाचा कोल्हा हा पिंगलक नावाच्या सिंहाच्या मंत्र्याचा पुत्र होता. मंत्रीपदापासून दूर केल्यावर त्याने आत्मसंयमानेच आणि बुद्धि चातुर्याने आपले स्थान मिळवले. हा त्याच्या आत्मसंयमाचाच परिणाम होता. या उल्लेखांवरून हे स्पष्ट होते की यश मिळविण्यासाठी आत्मसंयमाची गरज आहे. एखाद्या वस्तुवर आपले मालकी हक्क मिळवण्याचा प्रयत्न करणे, स्वतःला लाभ झाला नाही तर दुसऱ्यालाही त्याचा लाभ होवू देवू नये म्हणजे लोभ होय. उदारतेने मनुष्याचा विकास होतो. त्याविषयी विष्णुशर्मा म्हणतात की, अधिक तृष्णा करू नये इत्यादि अनेक कथातून लोभाचा त्याग केला पाहिजे असा उपदेश दिला आहे. यावरून हे स्पष्ट होते की निर्लोभिताच मनुष्याच्या विकासाचा आधार आहे. मानवी जीवनात नैतिकतेचे पालन करूनच पारलौकिक सुख मिळू शकते. नैतिकतेमध्ये शारीरिक शिक्षणही महत्त्वाचे आहे. त्यामध्ये अष्टांग योग येतात. (यम, नियम, आसन, प्राणायाम, ध्यान, धारणा, समाधि) पञ्चतन्त्रकारांनी

याकडेही पाठकांचे लक्ष केंद्रीत केले आहे. अशाप्रकारे नैतिक शिक्षणाचे पञ्चतन्त्रकारांनी सांगोपांग विवेचन केले आहे.

भारतात नैतिक मार्गाने प्रजेच्या सुख-समृध्दि, शांती आणि सुव्यवस्थेसाठी तसेच राजा कुमार्गगामी होवू नये म्हणून प्राचीन ऋषिंनी आचारसंहिता निर्माण केली. पञ्चतन्त्रकार विष्णुशर्मानीही या ग्रंथात आचारसंहितेचा स्वीकार केला आहे. विशेषत्वाने या ग्रंथातील पात्र पशु-पक्षी आहेत. त्यामुळे ते आणखीनच महत्त्वाचे ठरते.

हा ग्रंथ भाग्यवादिता व कर्म, धाडस, उद्योग, धैर्य इत्यादिंवर तसेच 'वसुधैव कुटुम्बकम्' या भावनेवर विश्वास ठेवत असलेला दिसतो. पञ्चतन्त्र निर्धनता आणि लोभ मनुष्याचे सर्वात मोठे दुर्भाग्य मानतो. उत्तम जीवनासाठी 'स्वकार्य साधयेद्धीमान' तसेच 'बुद्धिमान पुरूष अपमान सहन करीत, मानाची पर्वा न करता आपले कार्य सिद्ध करतो. कारण 'स्वार्थ भ्रंशो हि मूर्खता' अर्थात आपल्या कार्याला हानी पोहोचविणे ही मूर्खता आहे.' असा उपदेश पञ्चतन्त्रकार देतात.

## ६.२. 'कथासरित्सागर' ग्रंथातील मूल्ये

कथासरित्सागराच्या अध्ययनातून तत्कालीन समाजातील नैतिक मुल्यांवरही महत्त्वपूर्ण प्रकाश पडतो. नैतिकतेचे मापदण्ड देश आणि काळानुसार वेगवेगळे असते. समाजामध्ये मूल्ये सतत बदलत असतात आणि काही मूल्ये परिवर्तनशील असत नाहीत. आजसुद्धा मानव त्या मूल्यांविषयी आस्थावान आहे. आणि भविष्यातही राहिल. यामध्ये अस्तेय, धोका देणे, उत्कोच, विषय वासना इत्यादि विशेष रूपाने उल्लेखनीय आहेत.

सोमदेवाने समाजातील चांगले-वाईट, उच्च-नीच, श्रीमंत-गरीब, धर्मात्मा-गुंड इत्यादींचे वर्णन त्यांनी आपल्या ग्रंथात केले आहे. चोर, द्युत खेळणारा, धूर्त, वेश्यागामी, चालाक, कपटी, बदमाश, ठग, रंगेल, भिक्षु इत्यादींच्या कथा सोमदेवांनी लिहिल्या आहेत. द्युत खेळणाऱ्यांचा उल्लेख या ग्रंथात मिळतो. अनेक धूर्त, द्युत खेळणाऱ्यांच्या कथा या ग्रंथात आहेत. त्यांनी फसवणूक करून धनसंग्रह केला आहे. द्युताच्या दुष्परिणामामुळे तत्कालीन समाज याला वाईट मानतो.

अशा प्रकारे या प्रकरणात ग्रंथांतील मूल्याचा अभ्यास केला जाईल.

## प्रकरण सातवे

## पञ्चतन्त्रातील घटकांचे अध्ययन

## (सामाजिक, राजनैतिक, प्रशासन आणि न्यायव्यवस्था तसेच भौगोलिक घटक)

या प्रकरणात पञ्चतन्त्र आणि कथासरित्सागर ग्रंथातील सामाजिक, राजनैतिक, सांस्कृतिक आणि भौगोलिक घटकांचे अध्ययन केले जाईल.

### ७.१. पञ्चतन्त्रातील सामाजिक घटक

सामाजिक घटकामध्ये-तत्कालीन कुटुंब व्यवस्था, वर्णव्यवस्था, जातिव्यवस्था, समाजातील निर्धन व्यक्ती, समाजातील उपष्टम्भकारी घटक (गुन्हेगारी), आश्रमव्यवस्था, पञ्चतन्त्रातील स्त्री स्त्री-जीवनातील विविध टप्पे, स्त्री-निंदा, विवाह प्रथा-विवाहाचे घटक-वंश व वय, वधु-वराची अनुरूपता, वरान्वेषण व हुंडा, विवाहाचे घटक, विवाहाचे प्रकार, खान-पान, वेशभूषा आणि मनोरंजनाचे साधन, अर्थव्यवस्था - अर्थाचे महत्त्व, कृषि, पशुपालन, व्यापार, इतर साधन, दळण-वळण व्यवस्था, पञ्चतन्त्रातील शिक्षण व्यवस्था-धार्मिक शिक्षण, नैतिक शिक्षण, व्यावसायिक शिक्षण, आयुर्वेद शिक्षण, सैन्य शिक्षण, राजनैतिक शिक्षण, धर्म व धार्मिक संप्रदाय, दार्शनिक संप्रदाय, विविध कला-संगीता, गीत, नृत्य आणि वाद्य मनोरंजन इत्यादी विषयीचे विवेचन या प्रकरणात करण्यात येईल.

### ७.२. पञ्चतन्त्रकाळातील राज्यशास्त्र

पञ्चतन्त्रातील राज्याचे घटक, राज्याचे अंग, राजा, राष्ट्र, दुर्ग, कोष, दण्ड(सेना), मित्र, पञ्चतन्त्रातील षाड्गुण्य- सन्धि, विग्रह, यान, आसन, द्वैधीभाव, संश्रय, पञ्चतन्त्रातील उपाय, राजमण्डल, पञ्चतन्त्रातील मण्डल सिद्धान्त इत्यादी घटकांचे विवेचन करण्यात येईल.

### ७.३. पञ्चतन्त्रातील प्रशासन

राजतन्त्र आणि प्रजातन्त्र, पञ्चतन्त्रातील शासन, राजा आणि प्रजेचे संबंध, मन्त्रि-मंत्र्याचे गुण, मंत्री आणि त्यांचे कार्य, राजकर्मचारी, पञ्चतन्त्रातील दूत आणि गुप्तचर व्यवस्था, युद्ध आणि आयुधे, न्याय विभाग आणि कार्य पद्धती इत्यादींचा उल्लेख यात आहे.

### ७.४. पञ्चतन्त्रातील न्याय व्यवस्था

यात पञ्चतन्त्रकालीन न्याय व्यवस्थेचे विवेचन करण्यात येईल.

### ७.५. पञ्चतन्त्रातील भौगोलिक घटक

जनपद आणि नगर, वन, पर्वत, नदी आणि जलाशय, नैसर्गिक संकटे, वृक्ष आणि लता, पशु, ग्राम्य पशु वन्य पशु, पक्षी, जीव-जन्तु-जलचर, थलचर, नभचर इत्यादींचे विवेचन करण्यात येईल..

पञ्चतन्त्र हे भारतीय साहित्यातील एक अमुल्य निधी आहे. ही एक उपदेशात्मक पशुकथा आहे. यातून विविध प्राण्यांच्या माध्यमातून तत्कालीन संस्कृति, राजनीति आणि सामाजिक

जीवनावर प्रकाश पडला आहे असे म्हणल्यास वावगे ठरणार नाही की या ग्रंथाने भारतीय संस्कृतिचा प्रसार करण्यासाठी फार मोठे योगदान दिले आहे. भारतीय संस्कृति, सामजिक जीवन, शिक्षण, कला, अर्थव्यवस्था आणि राज्यशासत्राच्या विविध पैलूंचे विवेचन या ग्रंथात मिळते.

या ग्रंथात पाच तन्त्र असल्यामुळे याला पञ्चतन्त्र म्हटले आहे. तन्त्राचा अर्थ अध्याय किंवा खंड असा आहे.

प्रथम तन्त्रामध्ये एक यशस्वी राजनीतिज्ञ आणि चतुर व्यक्ति बनण्याचा मार्ग सांगितला आहे. या तंत्रात एक मूख्य कथा असून अनेक उपकथाही आल्या आहेत. द्वितीय तन्त्र 'मित्रसम्प्राप्ति' आहे. मित्रप्राप्ति कशी करावी याबद्दलचे उपाय या तन्त्रात वर्णन करण्यात आले आहेत. यामध्ये हिरण्यक, लघुपतनक, मंथरक आणि चित्रांग या प्राण्यांच्या माध्यमातून मनुष्याने संकटांना टाळण्यासाठी उत्तम मित्र बनविले पाहिजे असा उपदेश दिला आहे. तृतीय तन्त्र 'काकोलूकीयम्' आहे. या तंत्रात कावळा आणि घुबड यांच्या शत्रुत्वाच्या माध्यमातून सन्धि विग्रह इत्यादि राजनैतिक उपाय सांगितले आहेत. चतुर्थ तंत्र 'लब्धप्रणाश' आहे. या तन्त्रात वानर आणि मगराची मुख्य कथा आहे. एखाद्या कार्यात ज्या व्यक्तिची बुद्धि नष्ट होत नाही अर्थात जो संकटकाळातही आपल्या बुद्धिचा त्याग करीत नाही तो व्यक्ति पाण्यात असणाऱ्या वानराप्रमाणे संकटापासून मुक्ति मिळवू शकतो. बहुतेक संकट आल्यावर मनुष्य आपले धैर्य सोडून त्यामध्ये बांधला जातो. आणि जे मिळवले आहे तेही तो गमावून बसतो. लब्धप्रणाशातील कथांमधून राजनीतिचे हे रहस्य सांगण्यात आले आहे. पाचवे तन्त्र 'अपरीक्षितकारकम्' आहे. न विचार करता एखादे कार्य केले तर मनुष्याला नंतर पश्चाताप करावा लागतो. आणि समाजापुढे तो उपहासाचा विषय होतो. त्यामुळे विचार करून कार्य करणारा व्यक्ति कुशल असतो असा उपदेश या तंत्रात केला आहे.

पञ्चतन्त्रातील सामाजिक जीवनात कुटुंबाला महत्त्वाचे स्थान आहे. कुटुंब हे मानवाच्या सामाजिक विकासाची पहिली पायरी आहे. कुटुंबाची निर्मिती नैसर्गिक, आर्थिक व सामाजिक कारणांमुळे झाली आहे. त्या काळात संयुक्त कुटुंब पद्धती होती. त्या कुटुंबात पति-पत्नीशिवाय इतरही नातेवाईक रहात असत. सर्वजण एकत्रित राहात असत. कुटुंबात एक प्रमुख प्रतिनिधी असायचा. कुटुंबातील शांती ही दाम्पत्य जीवनावर आधारित होती. सामान्यतः तत्कालीन लोकांचे वैवाहिक जीवन हे शांत आणि सुखी होते. परंतु ज्या कुटुंबातील स्त्रिया पुंश्चली किंवा स्वच्छन्दगामिनी होत्या त्या लोकांचे जीवन दुःखाचे होते. भारतीय वैवाहिक

जीवनाच्या यशाचा मुख्य आधार पत्नीची सच्चरित्रता आणि व्यावहारिक कुशलता मानली आहे. कुटुंबात भरण पोषणाचा भार मुख्यतः पित्यावर होता. गृहकार्य पत्नी सांभाळित होती. पुत्र आणि भाऊ पित्याच्या कार्यामध्ये मदत करीत होते. पित्याद्वारे अर्जित संपत्तित किंवा संयुक्त कुटुंबात भावाने मिळवलेल्या संपत्तित इतर भावांचीही समान वाटणी (अधिकार) होती. चांगल्या किंवा वाईट कार्यात भावांची सहमति आणि सहयोग आवश्यक असते. एखाद्याच्या विरोधाने कुटुंबाचे विभाजन होवू शकते. कुटुंबात पुत्राला विशिष्ट स्थान होते. पुत्राच्या जन्माची सार्थकता कुळातील परंपरेचे अनुकरण आणि वंशाची प्रतिष्ठा वाढविण्यात होती.

भारतीय सामाजिक व्यवस्थेत वर्णव्यवस्थेला विशिष्ट स्थान आहे. प्राचीन काळापासूनच वर्णव्यवस्था ही भारतीय सामाजिक जीवनाला विविध प्रकारे प्रभावित करीत आली आहे. पञ्चतन्त्रात आलेल्या उल्लेखानुसार त्या काळातही प्राचीन मान्यताच मान्य होती असे दिसते. चारही वर्णाची उत्पत्ती आणि कर्माचे स्पष्ट वर्णन आले नाही. परंतु ब्राह्मणांच्या कर्तव्याविषयी सांगितले आहे. या काळात वर्णव्यवस्थेत थोडी शिथिलता दिसून येते. परंतु जाति आणि उपजातिचे बाहुल्य होते. एखाद्या वर्णातील लोक परंपरागत व्यवसायात स्थिर नव्हते.

पञ्चतन्त्रातील अनेक कथेत ब्राह्मण पात्र आहेत. त्या कथांच्या माध्यमातून ब्राह्मणांची सामाजिक स्थिती दाखविण्याचा प्रयत्न झाला आहे. समाजात ब्राह्मणाला उच्च स्थान होते. त्यांना अवध्य मानले गेले. ब्राह्मण, गो आणि स्त्रियांच्या रक्षणासाठी जो व्यक्ति आपला प्राण त्याग करीत होता. तो प्रशंसेस पात्र होता. यावरून समजते की ब्राह्मण समाजात अग्रगण्य आणि आदरास पात्र होते. त्यांना सामाजिक प्रतिष्ठा होती. अध्ययन-अध्यापन त्यांचे मुख्य कर्म होते. आचार्य विष्णु शर्माच्या मते अनध्यायी ब्राह्मण तात्काळ नष्ट होतो. ते शास्त्रवेत्ता आणि ज्योतिषज्ञ होते. शास्त्रवेत्ता ब्राह्मणांना खुप प्रतिष्ठा होती. शिक्षण देण्यासाठी किंवा कर्तव्याकर्तव्याचे ज्ञान देण्यासाठी त्यांना राजदरबारात ठेवले जात असे. या ग्रंथात तपोनिष्ठ ब्राह्मणाला स्तुत्य म्हणले आहे.

पञ्चतन्त्रातील ब्राह्मण केवळ शास्त्र विहित कर्म करीत नव्हते तर इतर व्यवसायही ते करीत असे. सात्विक वृत्तिचे, शास्त्रज्ञ, आणि धर्मनिष्ठ ब्राह्मणांना समाजात आदर होता.

वर्णव्यवस्थेत ब्राह्मणानंतर क्षत्रियांना दुसरे स्थान होते. या ग्रंथात क्षत्रिय राजांचा उल्लेख आला आहे. या राजांना निपुण, न्यायप्रिय, प्रजारक्षक शासकाच्या रूपात चित्रित केले आहे.

व्यवसाय आणि कृषि कर्माचा भार वैश्यांवर होता. पञ्चतन्त्रातील अनेक कथा व्यावसायिक सार्थवाहांशी संबंधित आहेत. पञ्चतन्त्राची सुरूवातच वर्धमानक नावाच्या सावकाराचे व्यापारिक

यात्रेने होते.  तत्कालीन समाजात व्यापार व्यवसायाची प्रगति सूचित करते.  वैश्य लोक देशान्तर करून वस्तु स्वदेशात आणत होते आणि स्वदेशी वस्तूंना बाहेर विकत होते.  त्याशिवाय कृषि कार्य करणारेही लोक होते.

सर्व वर्णात शुद्राला शेवटचे स्थान आहे.  पञ्चतन्त्र काळात शूद्राचा धर्म पुर्ववत होता.  त्या काळात जातिव्यवस्था अधिक व्यापक झाली होती.  राजदरबारात राहणारे बंदी, मागध, सेवक इत्यादि तसेच समाजाची सेवा करणारे, विणकर, काष्ठकर इत्यादिंवरून शुद्रांच्या स्थितीचे अनुमान लावता येते.  या ग्रंथात अनेक ठिकाणी धोबी, न्हावी, रथकार इत्यादिंचा उल्लेख आहे. ते शूद्र वर्णाचेच होते.  कारण त्यांचे एकमेव कार्य समाजातील लोकांची सेवा करणे हेच होते. विविध जातिंमध्ये विणकर, नापित, रथकार, रजक, मालाकार, लुब्धक, धीवर, चाण्डाल, कुम्भकार, गोपालक इत्यादि अनेक जातिंचा उल्लेख पञ्चतन्त्रात आला आहे.

पञ्चतन्त्रात निर्धनाविषयी सामाजिक उपेक्षेचा भाव यथार्थरूपाने चित्रित केले आहे.  हा ग्रंथ तत्कालीन समाजातील निर्धन लोकांची बहुलता (आधिक्य) सूचित करते.  निर्धनांना समाजात सन्मान नव्हता.  शक्तिशाली आणि धनवान लोक त्यांचे शोषण करीत होते.  त्यांना यातना दिले जात असे.  राजाकडून कसलीही मदत मिळत नव्हती.  धनवान लोक धनाचा अधिक संग्रह करून समृद्ध होत होते तर निर्धन व्यक्ती हा भोजन–वस्त्रासारख्या प्राथमिक गरजांचीही पूर्तता करू शकत नव्हता.

समाजात अशांतिमुळे काही ईर्ष्यात्मिक वृत्तिचे लोकही होते.  ते लोक ईर्ष्येमुळे दुसऱ्यांची प्रगति पाहू शकत नव्हते.  अपमानाचा बदला घेण्यासाठी ते कुटुंबाचाही समूळ नाश करीत होते.  तेंव्हा अशा व्यक्तिपासून सतर्क राहण्याचा सल्ला या ग्रंथात दिला आहे.

पञ्चतन्त्रात ज्याप्रमाणे लोकांचा समूह हा वेगवेगळे वर्ण आणि जातिने विभक्त होता त्याप्रमाणे मनुष्याच्या व्यक्तिगत जीवनातही चार आश्रम होते.  ब्रह्मचर्याश्रम, गृहस्थाश्रम, वानप्रस्थ आणि संन्यास हे ते चार आश्रम आहेत.  जीवनाच्या आरंभी इंद्रियांना वश करणे आणि विद्याध्ययन करणे ब्रह्मचर्याश्रमाचा मुख्य सिद्धान्त होता.  ऋषिऋण, पितृ–ऋण, आणि देव ऋणातून मुक्त होणे तसेच अतिथिसेवा, ऋषि व पितरांची सेवा करणे आणि प्रजोत्पादन गृहस्थाश्रमाचा मुख्य सिद्धान्त होता.  या ग्रंथात अनेक साधु–संन्यासांचे व्रत नियम आणि आचाराचे वर्णन मिळते.  ते वानप्रस्थ आणि संन्यास आश्रमांकडे संकेत करते.

स्त्री ही मानवी जीवनातील एक अभिन्न अंग आहे.  पञ्चतन्त्रकालीन समाज काहीसा विकृत झाला होता.  त्याकाळी स्त्रियांच्या जीवनात अनेक समस्या होत्या.  तत्कालीन स्त्रीवर्गात

पुंश्चली, वेश्या, इत्यादींची अधिकता होती. कुलीन स्त्रियाही पथभ्रष्ट झालेल्या दिसतात. स्त्रिविषयी समाजाची दृष्टी निंदनीय झाली होती. ती जीवनसंगिनी आणि पतिव्रता कमी होती तर भोग्या अधिक होती. स्त्रियांचा मुख्य गुण लज्जा आहे अशी समाजात तिच्याविषयी धारणा रूढ होती. त्यांचे आदर्शरूप वैदिक व स्मृतिकाळात जसे होते त्या स्वरूपात स्त्रीला समाज पाहू इच्छित होता. परंतु कुलीन आणि सदाचारिणी स्त्रियांना पूर्वीप्रमाणेच प्रतिष्ठा होती. जो व्यक्ति प्राण देऊनही स्त्रिचे रक्षण करीत होता तो सनातन लोक प्राप्त करीत असे अशी मान्यता होती. स्त्री अवध्या होती. स्त्री जीवनात नैसर्गिकरित्या अनेक बदल होत असतात. स्त्री ही तीन स्थितीतून जात असते. कन्या, पत्नी, माता. याविषयीही स्त्रियांच्या जीवनात अनेक बदल होत असतात. स्त्री जीवनाचे विविध आयाम आहेत. कन्या, पत्नी, वधू, माता, विधवा, साध्वी, पोषितभर्तृका, पुंश्चली, वेश्या, कुंटिणी, गणिका इत्यादी. पञ्चतन्त्रात त्यांच्या स्थितीचे वर्णन आले आहे.

प्राचीन भारतीय समाजात षोडश संस्कारांना आदर्श स्थान होते. समाजाचे विकास कार्य आणि सुधार कार्यात विवाह संस्काराची महत्त्वाची भूमिका आहे. पवित्रता आणि शारीरिक दृष्टिकोनातून विवाहसंस्कार महत्त्वाचे मानले आहे. पञ्चतन्त्रात विवाहसंबंधाविषयी स्पष्ट मान्यता आहे की समान वित्त व समान कुळ असलेल्यांशीच विवाह संबंध प्रस्थापित करावे. विषमाशी केलेली मैत्री आणि विवाहसंबंध यशस्वी होत नाही. वरान्वेषणाची प्रथा प्राचीन आहे. पञ्चतन्त्रात वर शोधण्याचा उल्लेख मिळतो. या ग्रंथात हुंड्याचे उदाहरण मिळत नाही. परंतु कन्येला स्त्री धनाच्या रूपात काही दिले जात होते. या स्त्री धनाला मर्यादा नव्हती. स्त्रीधन देण्याची प्रथा होती. हिंदु धर्मशास्त्रकारांनी हिंदु विवाहाचे आठ प्रकार सांगितले आहेत. ब्राह्म, दैव, आर्ष, प्राजापत्य, आसुर, गान्धर्व, राक्षस आणि पिशाच हे होत. यामध्ये सुरूवातीचे चार विवाहाचे प्रकार समाजात अत्यंत सन्मानित आणि आदर्श होते. तर शेवटचे चार प्रकार निंदित होते. पञ्चतन्त्र काळात या विवाहप्रकारांची प्रथा होती. ग्रंथात काही ठिकाणी वृध्द-विवाहाचाही उल्लेख मिळतो. वृद्धावस्थेत धनवान व्यक्ति एखाद्या निर्धन व्यक्तिला धन देऊन त्याच्या कन्येशी विवाह करीत होता. बहु-विवाह अर्थात बहुपत्नी आणि बहुपति विवाह होय. पञ्चतन्त्रात बहु-विवाहाचे अनेक उदारहण मिळतात. बहुपति विवाहाचा उल्लेख मिळत नाही. परंतु असे उदाहरण आहेत की स्त्री आपल्या पतिला सोडून दुसऱ्या पुरूषाकडे जात होती. पञ्चतन्त्रात बहुपत्नी विवाहाचे उल्लेख आहेत.

या ग्रंथात अनेक स्वादिष्ट पदार्थाच्या सेवनाचा उल्लेख मिळतो. हे अन्न पान, चोष्य, लेह

(चाटून खाणारे पदार्थ) इत्यादी प्रकारचे होते. लोक शेवाया, मण्डक, वाटिका बनविण्याचा उल्लेख मिळतो. भोजन बनविण्यासाठी माती, कांसे, तांबे इत्यादि भांड्यांचा उपयोग केला जात असे. तसेच लोक अरण्यातील फळ–फुलांवरही अवलंबून होते.

तत्कालीन समाजात मांस भक्षणही केले जात असे. या ग्रंथात मद्यपानाचाही उल्लेख मिळतो. सामाजिक दृष्टिने मद्यपान वाईट समजले जात असे. मद्यपानाच्या दोषांचेही विवेचन या ग्रंथात आले आहे. त्याकाळी मद्यपान ब्राह्मणांसाठी निंदनीय होते. समाजात द्युतक्रिडेचीही प्रथा होती.

पञ्चतन्त्रात विविध वस्त्रांचाही उल्लेख मिळतो. स्त्रिया स्वतःला सजविण्यासाठी विविध प्रसाधनांचा आणि आभूषणांचा वापर करीत होत्या. तत्कालीन स्त्री व पुरूषांना विविध वस्त्र आणि आभुषणांची आवड होती. मनोरंजनाच्या साधनांवरही प्रकाश टाकला आहे. गीत–गायनाला महत्त्व देण्यात आले आहे.

पञ्चतन्त्रकाळातील शिक्षणाला चार विभागात विभागले जावू शकते– धार्मिक शिक्षण, नैतिक शिक्षण, व्यवसायिक शिक्षण आणि राजनैतिक शिक्षण यांचाही उल्लेख मिळतो.

पञ्चतन्त्रात मंडल सिद्धान्ताला 'चतुर्मण्डलावस्था' असे म्हणले आहे. या ग्रंथात राजा आणि प्रजेच्या संबंधाविषयी उल्लेख मिळतो. तसेच मन्त्रि–परिषदेबद्दलही विचार करण्यात आले आहे. कंचुकी, द्वारपाल, राजपुरूष आणि नगररक्षक इत्यादी विशिष्ट तसेच इतर सामान्य पारिचारक वर्ग आणि सेवकांचा उल्लेख मिळतो. दूत आणि गुप्तचर व्यवस्थेचाही उल्लेख करण्यात आला आहे. या ग्रंथात युद्धांशी संबंधित गोष्टींवरही प्रकाश टाकण्यात आला आहे. आयुधामध्ये पञ्चतन्त्रात धनुष्य, लाठी इत्यादिचा वापर केलेला मिळतो.

तत्कालीन न्याय कार्यासाठी एखाद्या सभेची किंवा समितीची निर्मिती केली जात असे. त्यात सक्षम, योग्य व्यक्तिंचीच नियुक्ती होत होती.

या ग्रंथात जनपद व नगरांचा उल्लेख आला आहे. वन, पर्वत, नदी, वृक्ष व लतांचाही उल्लेख आला आहे. अशा प्रकारे पञ्चतन्त्र ग्रंथाच्या अध्ययनातून तत्कालीन सामाजिक, राजनैतिक, प्रशासनिक, न्याय, भौगोलिक घटकांची माहिति मिळते.

## प्रकरण आठवे

## कथासरित्सागर ग्रंथातील घटकांचे अध्ययन

## (सांस्कृतिक आणि भौगोलिक घटक)

### ८.१. सांस्कृतिक घटक

या प्रकरणात कथासरित्सागर ग्रंथातील सांस्कृतिक घटकांचे अध्ययन केले जाईल. त्यामध्ये

धर्म, वर्णव्यवस्था आणि व्यवसाय, जातिव्यवस्था, शिक्षणव्यवस्था, नैतिक स्तर, मद्यपान, आत्महत्या, उत्कोच (लाचखोरी) आणि भ्रष्टाचार, स्त्रीचरित्र, उत्सव, श्रृंगार प्रसाधन, मनोरंजन, द्युत, मल्लकला, नट, जलक्रीडा, संगीत, चित्रकला, पशुपक्षीपालन, खेळणी, अन्नपान इत्यादी सांस्कृतिक घटकांचे अध्ययन केले जाईल.

कथासरित्सागर हा ग्रंथ सोमदेव भट्ट यांनी लिहीला. यात एकूण अठरा अध्याय आहेत. ते म्हणजे कथापीठ, कथामुख, लावाणक, नरवाहनदत्तजन्म, चतुर्दारिका, मदनमंचुका, रत्नप्रभा, सूर्यप्रभा, अलंकारवती, शक्तियशा, वेला, शशांकवती, मदिरावती, महाभिषेक, पंच, सुरतमंजरी, पद्मावती आणि विषमशील लंबक.

या ग्रंथाच्या अध्ययनातून असे समजते की या ग्रंथाचे केवळ ऐतिहासिक महत्त्वच नाही तर साहित्यिक महत्त्वही आहे. भारतातील प्राचीन कथांचा हा ग्रंथ आहे. या ग्रंथाचा मूळ नायक नरवाहनदत्त आहे. या मूळ चौकटीमध्ये अनेक कथा गुंफल्या आहेत. अनेक कष्टांना सहन करीत नायकाचे आपल्या प्रियसीशी पुनर्मिलन होते किंवा त्याला एखादी नवीन प्रेयसी भेटते. या ग्रंथात अनेक कथातंतुचे जाळे पसरले आहे. नरवाहनदत्ताच्या कथेपेक्षाही त्याचा पिता उदयन आणि त्यांच्या दोन पत्नी वासवदत्ता आणि पद्मावती तसेच त्यांचा स्वामिभक्त, बुद्धिमान, नीतिमान मंत्री यौगन्धरायणाची चित्तवेधक अशी कथा आहे. या ग्रंथात अनेक कथा संग्रहीत आहेत. द्युलोक आणि पृथ्वीच्या निर्माणासंबंधी, ऋग्वेदकालीन कथा आहेत. त्याचप्रमाणे रक्तपात करणाऱ्या वेताळांची कथा, प्रेमकथा तसेच देवता, मनुष्य आणि असुरांच्या युद्धाच्या कथा इथे संग्रहित आहेत.

कथासरित्सागर ग्रंथात अनेक अद्भूत कन्या आणि त्यांचे धाडशी नायक, राजा आणि नगर, राजतन्त्र आणि षडयन्त्र, जादू-टोणा, छळ-कपट, हत्या, युद्ध, रक्तपात, वेताळ, पिशाच, यक्ष, प्रेत आणि पशुपक्ष्यांच्या कथा तसेच भिकारी, साधु, दारू पिणारे, वेश्या, विट, कुंटीणी यांच्या कथा आल्या आहेत. अशाप्रकारे हा ग्रंथ भारतीय कल्पनात्मक जगाचे दर्पण आहे. पंडित सोमदेवांनी पुढील पिढीसाठी ती ठेव म्हणून ठेवली आहे. या ग्रंथात मूर्खांच्या कथाही आल्या आहेत. तसेच धुर्तांच्या कथा, शठ, द्युत खेळणारे इत्यादींच्याही कथा आल्या आहेत.

या ग्रंथात स्त्रियांच्या अनेक कथा आल्या आहेत. या कथेतून त्यांचे दुःश्चरित्र आणि वाईट आचरण समजते. त्याशिवाय सति, साध्वी स्त्रियांच्याही कथा संग्रहीत आहेत. या ग्रंथात एकीकडे गृहिणी स्त्रियांच्या चारित्र्याविषयी उल्लेख आला आहे तर दुसरीकडे अनेक वेश्यांच्या उदात्त चारित्र्याचाही उल्लेख आला आहे.

कथासरित्सागर हा ग्रंथ सांस्कृतिक अध्ययनासाठी महत्त्वाचा ग्रंथ आहे. भारतीय संस्कृतिच्या अनेक घटकांचे उद्घाटन लेखकांनी आपल्या ग्रंथात केले आहे. तत्कालीन धार्मिक स्थितिचे आणि धार्मिक स्थळांचाही उल्लेख ग्रंथात आला आहे. भारतातील स्त्रियांची स्थिति, जाति-व्यवस्था, कला आणि स्थापत्य, सामाजिक, आर्थिक, राजनैतिक, राजपूत, द्युत-क्रीडा, मदिरालय आदी सर्व सांस्कृतिक तथ्यांचा उल्लेख या ग्रंथात आला आहे. भारतीय संस्कृतिच्या सम्यक ज्ञानासाठी कथासरित्सागर या ग्रंथाचे अध्ययन आवश्यक आहे. भारत आणि भारतीय जनमाणसाचे वास्तविक चित्रण सोमदेवांनी मनोरंजक शैलीने केले आहे.

या ग्रंथात धर्माविषयीचा उल्लेख आला. तसेच जाति आणि व्यवसायाचा उल्लेख आला आहे. प्राचीन भारताची मुख्य विशेषता म्हणजे वर्णव्यवस्था होय. कथासरित्सागर काळात काही नवीन सामाजिक नियम व मान्यता निर्माण झाल्या होत्या. जाति प्रथेमध्ये संकीर्णता येत होती. नविन जाति आणि उपजाति निर्माण होत होत्या. जाति-व्यवसायासंबंधीची शिथिलता काही उदाहरणांवरून लक्षात येते. ब्राह्मणातच क्षात्र ब्राह्मण, वैश्य ब्राह्मण, शूद्र ब्राह्मण आणि निषाद ब्राह्मणांचाही उल्लेख आला आहे. त्या काळात नविन जातीची निर्मिती झाली होती. तिला 'कायस्थ' असे म्हणले गेले. त्याकाळात त्यांचे मुख्य कार्य लेखन किंवा लिपिकाचे होते. या ग्रंथातून काही जातीचा उल्लेख आला आहे. त्यात शबर, पुलिन्द, भिल्ल, निषाद, व्याध, डोम्ब इत्यादी आहेत. या ग्रंथात चाण्डाळाचे जीवन, त्यांची राहणीमान यावर महत्त्वपूर्ण प्रकाश पडतो. शबर लोक वाघाची कातडी परिधान केल्याचा उल्लेख आला आहे.

कथासरित्सागर ग्रंथाच्या अध्ययनातून तत्कालीन शिक्षण पद्धती, स्वरूप यावरही प्रकाश पडतो. तसेच तत्कालीन समाजातील नैतिक मूल्यांवरही प्रकाश पडतो.

कथासरित्सागर ग्रंथात मद्यपानाचा उल्लेख आला आहे. यावरून असे समजते की, तत्कालीन समाजात मदिरापान केले जात असे. तीर्थस्थळावर जाऊन आत्महत्या करण्याचा उल्लेख आला आहे.

उत्कोच आणि भ्रष्टाचार निश्चितच पतनोन्मुख शासनाचे लक्षण आहे. या ग्रंथाच्या आधारे तत्कालीन समाजातील उत्कोच आणि भ्रष्टाचारावर प्रकाश पडतो. तसेच फसवणूक करण्याचाही उल्लेख आला आहे.

ग्रंथात वेश्या, देवदासी इत्यादिंचा उल्लेख आला आहे. तसेच उत्सवांचाही उल्लेख आला आहे. हे उत्सव नगरात उत्साहाने साजरे केले जात असत. समाजातील सर्व वर्ग आणि प्रत्येक वयातील व्यक्ति यात सहभागी होत असत. या ग्रंथातून तत्कालीन स्त्री-पुरुषांचे वस्त्र,

अलंकार आणि सौंदर्य प्रसाधनांवर प्रकाश पडतो. तसेच मृगया, द्युत, मल्ल, जल-संतरण, विहार, संगीत, चित्रकला, पशुपक्षिपालन, काष्ठमय खेळणी इत्यादि बाबींवर प्रकाश पडतो.

खान-पानाविषयीचा उल्लेख मिळतो. भोजन, भक्ष्य, लेह, षड्रस आणि काही परिभाषिक शब्दांचा उल्लेख आला आहे. तसेच मद्यपानाचाही उल्लेख आला आहे.

या ग्रंथाच्या अध्ययनातून सोमदवोच्या बृहत् भौगोलिक आयामाची माहिती मिळते. त्यामध्ये देश-विदेश, प्रदेश, द्वीपान्तर-सन्निवेश, तीर्थ, जनपद, नगर, ग्राम, पर्वत, अरण्य, रत्नाकर, नदी इत्यादिंचा उल्लेख आला आहे.

## प्रकरण नववे

## हितोपदेश, पञ्चतन्त्र आणि कथासरित्सागर ग्रंथांचे तौलोनिक अध्ययन

या प्रकरणात हितोपदेश, पञ्चतन्त्र आणि कथासरित्सागर ग्रंथांचे तौलोनिक अध्ययन करण्यात येईल. पुनरावृत्ती दोष टाळावा व सुलभ पद्धतीने लेखन व्हावे या दृष्टीने तक्ता स्वरूपात विवेचन करण्यात आला आहे. तक्ता क्रमांक १ मध्ये ग्रंथाचे नाव ग्रंथकाराचे नाव, ग्रंथाचे स्वरुप, आधारग्रंथ, ग्रंथाचे महत्त्व वर्णिले असून तक्ता क्रमांक २ मध्ये पात्रवैविध्य, मूल्ये तसेच ग्रंथातील सामाजिक राजकीय, सांस्कृतिक, भौगोलिक घटकांच्या माहितीचे वर्णन केले आहे.

※ हितोपदेश हा नीतिकथा साहित्यातील महत्त्वाचा ग्रंथ आहे. या ग्रंथाचा मूळ आधार ग्रंथ पञ्चतन्त्र आहे. याचा स्वीकार स्वतः कवीने केला आहे.

'पत्र्चतन्त्राथान्यस्माद् ग्रन्थादाकृट्य लिख्यते'

या ठिकाणी मित्रलाभ (मित्र जोडणे) सुहृदभेद (मित्रांची ताटातूट), विग्रह (युद्ध) व संधि (तह) ही चार प्रकरणे पञ्चतन्त्र व इतर ग्रंथ यांच्या आधारे यात वर्णिली आहेत. पञ्चतन्त्र आणि हितोपदेशचा प्रतिपाद्य विषय एकच आहे. पञ्चतन्त्र हा विस्तारित ग्रंथ आहे तर हितोपदेश संक्षेपात लिहिलेला ग्रंथ आहे. त्यामुळे पञ्चतन्त्रच हितोपदेशाचे आधार ग्रंथ आहे.

मूळात पत्र्चतन्त्रावर आधारित असून सुद्धा हितोपदेश अनेक अर्थांनी त्यापेक्षा वेगळे आहे. हा ग्रंथ मित्रलाभ, सुहृदभेद, विग्रह आणि सन्धि या चार विभागात विभागलेला आहे. पत्र्चतन्त्रातील दोन तंत्र 'मित्रभेद आणि मित्रसम्प्राप्ति'चा क्रम बदल करून हितोपदेशात 'मित्रलाभ आणि सुहृदभेद' ही दोन प्रकरणे आहेत. पञ्चतन्त्रातील तृतीय तंत्र काकोलूकीयमच्या आधारावर नारायण पंडितांनी विग्रह आणि सन्धि या दोन प्रकरणांची रचना केली. या दोन प्रकरणातच पञ्चतन्त्रातील पाचवे तंत्र 'अपरीक्षितकारकम्' च्या कथांचे अत्यंत कौशल्याने समावेश केला आहे. हितोपदेश कविची स्वतःचीही रचना आहे. तर काही ठिकाणी पञ्चतन्त्रातील कथांचे

संमिश्रण मिळते. हितोपदेशातही राजनीति आणि लोकव्यवहाराचे ज्ञान सांगितले आहे.

तिन्ही ग्रंथातील साम्य सांगत असता हितोपदेश आणि पञ्चतन्त्रातील कथा गद्यात आहे आणि त्यातून मिळणारी नीति पद्यात आहे. तर संपूर्ण कथासरित्सागर हे पद्यमय आहे. या ग्रंथात २१३८८ पद्य आहेत. ते १२४ तरंगांमधये विभागले आहे. याचा दुसरा विभाग लंबकांमध्ये आहे. या लंबकांची संख्या १८ आहे. पञ्चतन्त्रातील अनेक उल्लेखांवरून असे समजते की, पञ्चतन्त्रकाळात स्मृतिकार मनुचे मतच मान्य होते. कमी वयात विवाह करण्याची प्रथा होती. या प्रथेचे उल्लंघन करणे, लोकांसाठी सामाजिक अप्रतिष्ठा आणि धार्मिक बंधन होते. केवळ पञ्चतन्त्रातच स्मृतिच्या मतांचे समर्थन होते असे नाही तर संपूर्ण संस्कृत कथासाहित्यात हीच मान्यता होती. कथासरित्सागरात ही असे अनेक उदाहरण मिळतात.

या तिन्ही ग्रंथात सामाजिक, राजनैतिक आणि सांस्कृतिक घटकांचे वर्णन मिळते. या ग्रंथातून मनुष्यांना नैतिक उपदेश देवून त्यांना आदर्श, व्यवहारपटु, सदाचारी बनण्यावर भर दिला आहे.

कथासरित्सागरातील दहावा लंबक म्हणजे 'शक्तियशस्' लंबक होय. कथा सांगण्याच्या निमित्ताने यात संपूर्ण पञ्चतन्त्र आले आहे. हा शक्तियशस् लंबक पुष्कळ कथांनी भरलेला आहे. हे एक स्वतंत्र पुस्तकच आहे.

## प्रकरण दहावे

## उपसंहार

ग्रंथ अध्ययनाच्या आधारे निघणारे निष्कर्ष या प्रकरणात मांडले जातील. तसेच हितोपदेश, पञ्चतन्त्र आणि कथासरितसागर या ग्रंथातून दूरदृष्टी, व्यावहारिक चातुर्य, जिज्ञासू वृत्ती, शुद्ध चारित्र्य जोपासने, धाडसी वृत्ती इत्यादी गुणाचे सांप्रतकालीही दर्शन घडवता येईल. त्या दृष्टीने निघणारे निष्कर्ष मांडले जातील तसेच सामाजिक, राजनैतिक, सांस्कृतिक दृष्टीने निघणारे निष्कर्षही मांडले जातील.

अशा प्रकारे पहिल्या प्रकरणात शोधप्रबंधाच्या रूपरेषेचे विवेचन करण्यात आले आहे.

***

# संदर्भ ग्रंथ सूचि


१. आंबेडकर बापूजी मार्तंड, आवृत्ती तिसरी, जुलै १९५० हितोपदेश (मूळ संस्कृत ग्रंथाचे सुलभ मराठीत भाषांतर), प्रकाशन-दामोदर त्र्यंबक जोशी, बी.ए. (टिळक), व्यवस्थापक, चित्रशाळा प्रेस, १०२६, सदाशिव पेठ, पुणे-२

२. आगलावे प्रदीप, सामाजिक संशोधन पद्धती, प्रकाशक, श्री.प्रमोद मुंजे, विद्या प्रकाशन, रूईकर मार्ग, नागपूर-४४०००२

३. आचार्य ना.रा., हितोपदेशः नारायणपंडित संग्रहीत, निर्णयसागर प्रकाशन, मुंबई 1968-7th

४. आर्यभूषण-पुणे, ३६९, Panchtantra (4th, 5th Only)

५. करंबेळकर विनायक वामन, प्रथमावृत्ती १९५४, द्वितीयावृत्ती १९३६, संस्कृत साहित्याचा सोपपत्तिक इतिहास, विश्वभारती प्रकाशन, धनवटे चेम्बर्स, सिताबर्डी, नागपूर-१२, प्रकाशक व मुद्रक-अभय दिगंबर लवाटे, मॅजेस्टिक प्रिंटींग प्रेस, टिळक पुतळ्याजवळ, महाल, नागपूर-२

६. करे बिभीषण, प्रथमावृत्ती- ५ जुलै २०१५, सामाजिक संशोधनाची मूलतत्वे, प्रकाशक-शशिकांत पिंपळापुरे, विद्या बुक्स पब्लिशर्स, औरंगपुरा, औरंगाबाद.

७. कवठेकर पी.एन. संस्कृत साहित्य में नीतिकथा का उद्‌गम एवं विकास.

८. कविश्वर जी.व्ही. गीतातत्वदर्शन अथवा भारतीय नीतिशास्त्र अर्थात श्रीमद्‌भगवत् गीतेचे नीतिशास्त्र दृष्ट्या सांगोपांग व तौलनिक परीक्षण.

९. कीथ ए.बी. द्वितीय संस्करण, दिल्ली, १९६७, पुनर्मुद्रण-दिल्ली, १९७८, १९८६, २००२, २००७, २०११ संस्कृत साहित्य का इतिहास, मोतीलाल बनारसीदास, ४१ यू.ए. बंगलो रोड, जवाहर नगर दिल्ली-११०००७, २३६, नाईंथ लेन, १११

ब्लाक, जयनगर बंगलौर, ५६००१११, सनाज प्लाझा, १३०२, बाजीराव रोड, पुणे ४११००२, ८ महालक्ष्मी चैम्बर, वार्डेन रोड, मुंबई ४०००२६, १२० रायपेट्टा हाई रोड, मैलापूर, चेन्नई ६००००४, ८ 'केमेक स्ट्रीट', कोलकाता ७०००१७, अशोक राजपथ, पटना ८००००४ चौक, वाराणीस, २२१००१, नरेन्द्रप्रकाश जैन, मोतीलाल बनारसीदास, बंगलो राड, दिल्ली ११०००७ द्वारा प्रकाशित तथा जैनेन्द्रप्रकाश जैन, श्री जैनेन्द्र प्रेस, ए-४५, नारायणा, फेज-१, नई दिल्ली, ११००२८ द्वारा मुद्रित.

१०. कुमठेकर उदय, प्रथमावृत्ती, चैत्र शुद्ध प्रतिपदा, शके १९२९, गुढीपाडवा १९ मार्च २००७, भारतीय नऊ दर्शनांचे अभिनव प्रसन्न दर्शन, योगदर्शन, प्रसाद प्रकाशन-१८९२, सदाशिव पेठ, पुणे-४११०३०.

११. कुलकर्णी भीमराव सदाशिव, पहिली आवृत्ती, गुढीपाडवा, दि.११ एप्रिल २०१३, शुल्कयजुर्वेदाचा मराठी अनुवाद, भाग-१, भाग-२.
प्रकाशक-ओम नर्मदामैय्या प्रकाशन द्वारा, मनोहर गोखले, ११ पारिजात, सुयोगपथ, टिळकनगर, डोंबिवली (पूर्व)-४२१२०१.

१२. कोसंबी दामोदर धर्मानन्द, दशमं संस्करणम्, १९५९, विष्णुशर्मसंकलितं पञ्चतन्त्रम्, निर्णयसागर मुद्रणालयम्, मुंबई-२.

१३. कोल्हटकर कृष्णाजी केशव, प्रथमावृत्ती- दि.१४ जानेवारी २००३, शके १९२४, द्वितीयावृत्ती- दि.१४ फेब्रुवारी २००४, महाशिवरात्री, माघ वद्य चतुर्दशी, शके १९२५ तृतीयावृत्ती-दि. १४ जानेवारी २००७, मकरसंक्रांत शके २९२८, भारतीय मानसशास्त्र अथवा सार्थ आणि सविवरण पातजंल योगदर्शन, प्रकाशक-आदित्य प्रतिष्ठान, प्लॉ.नं.१५ वेदान्तनगरी सोसायटी, स.नं.४, कर्वेनगर, पुणे-४११०३०.

१४. कंगले र.पं. ऑक्टोबर १९८२, कौटीलीयम् अर्थशास्त्रम्, सचिव, महाराष्ट्र राज्य

साहित्य संस्कृति मंडळ, मंत्रालय, मुंबई-४०००३२.

१५. गुप्त पुष्पा 1st-2014, पञ्चतन्त्रम् ऑफ विष्णुशर्मा (अपरीक्षितकारकम्) विद्यानिधि प्रकाशन, दिल्ली.

१६. गुप्त गोकुलदास, बी.ए. सम्पादक-रामचन्द्र झा (व्याकरणाचार्य) पुनर्मुद्रित संस्करण २०११ ई., श्री विष्णुशर्माप्रणीत पञ्चतन्त्रम्, प्रकाशक-चौखम्बा विद्याभवन (भारतीय संस्कृति एवं साहित्य के प्रकाशक तथा वितरक) चौक (बैंक ऑफ बडोदा भवन के पीछे) पो.बा.नं.१०६९, वाराणसी-२२१००१.

१७. गोवंडे श्रीकांत/रानडे सुभाष, आवृत्ती-जुलै २०१३, श्रीविष्णुशर्माविरचितम् पञ्चतन्त्रम् (अपरीक्षितकारकम्), प्रकाशक-प्रोफिशन्ट पब्लिशिंग हाऊस, ५३५, शनिवार पेठ, शॉप नं.९, राधाकृष्ण बिल्डिंग, प्रभात सिनेमासमोर, पुणे-४११०३०.

१८. चित्राव सिध्देश्वरशास्त्री, ऋग्वेदाचे मराठी भाषांतर, प्रकाशिका-शैलजा विनायक चित्राव, कार्यवाह, भारतीय चरित्रकोश मंडळ, १२०६, अ/४५, जंगली महाराज रस्ता, पुणे-४.

१९. चित्राव सिध्देश्वरशास्त्री, प्रथम आवृत्ती-सप्टेंबर १९७२, द्वितीय आवृत्ती-सप्टेंबर २०१०, अथर्ववेदाचे मराठी भाषांतर, प्रकाशिका-शैलजा विनायक चित्राव, कार्यवाह, भारतीय चरित्रकोश मंडळ, १२०६, अ/४५, जंगली महाराज रस्ता, पुणे-४.

२०. चौखम्बा संस्कृत सिरीज, ऑफिस बनारस, पञ्चतन्त्रकम्-विष्णुशर्मा सङ्कलितं, पञ्चतन्त्र, 1999-firts.

२१. छत्रे वि.के., 1966-1st, हितोपदेश-मित्रलाभ (भाग-१) मराठी गद्य-पद्य अनुवाद निर्णयसागर प्रकाशन मुंबई.

२२. जोग द.वा. तृतीय आवृत्ती-१५ एप्रिल २००७, आचार्यभक्त विष्णु वामन बापटशास्त्री कृत सुबोध उपनिषत्संग्रह भाग-१, भाग-२, प्रकाशक-मु.द. जोग,

२०१, वास्तुभवानी प्रसाद, म.फुले रस्ता डोंबिवली (प.).

२३. जोशी का.अ., ढमढेरे पां.रा. 1957 1st, पञ्चतन्त्र सरळ मराठी भाषांतर, प्रकाशक– का.अ. जोशी, सदाशिव पेठ, पुणे.

२४. जोशी काशिनाथ अनंत, 1963-first, कथासरित्सागर–वैशिष्ट्यपूर्ण भारतीय कथासंग्रह, मराठी साहित्य प्रकाशन, पुणे.

२५. झा श्रीरामचन्द्र, व्याकरणाचार्यः, संस्करण–षष्ठम्, वि.सं. २०५६, श्रीनारायणपणित विरचितं हितोपदेशः, प्रकाशक–चौखम्बा, संस्कृत सीरीज, ऑफिस, वाराणसी.

२६. झा जटाशंकर, ओझा प्रफुल्लचन्द्र, 103260 VIII A, कथासरित्सागर, Vol-3, खण्ड–३, बिहार, राष्ट्रभाषा परिषद पटना.

२७. तीर्थ ओमानन्द, सं.२०२४, सत्तारईसवाँ पुनर्मुद्रण ४,०००, कुल मुद्रण १,३७,५००, पातंजलयोगप्रदीप, प्रकाशक एवं मुद्रक–गीताप्रेस, गोरखपुर–२७३००५, गोबिन्दभवन–कार्यालय, कोलकाता संस्थान.

२८. तेलंग ह.य. 1953-first, हितोपदेश कथा, P- संस्कृत भाषा–प्रचारिणी सभा, नागपूर.

२९. तेलंग ह.य. 1956- 2nd, हितोपदेश कथा, सं.भा.प्र.सभा नागपुर.

३०. पणशीकर वा.ल. 1925, 1930, 6th, Panchatantram (विष्णुशर्मा) निर्णयसागर, मुंबई.

३१. परब क.पां. 1925, 11th हितोपदेश, निर्णयसागर, मुंबई.

३२. पाण्डेय रामतेज, 1958-first, पञ्चतन्त्रम्, विष्णुशर्माविरचित, पंडित पुस्तकालय, काशी.

३३. पाण्डेय श्रीश्यामाचरण, प्रथम संस्करण १९७५, पुनर्मुद्रण–दिल्ली, १९८०, १९८३, १९८८, १९९०, १९८५, प्रकाशक–मोतीलाल बनारसीदास.

३४. प्रसाद एस.एन., प्रथम संस्करण-१९७८, कथासरित्सागर तथा भारतीय संस्कृति, प्रकाशक-चौखम्बा ओरियन्टलिया, पो.आ.चौखम्बा, पो.बाक्स नं.३२, गोकुलभवन के.३७११०९, गोपालमन्दिर लेन, वाराणसी-२२१००१ (भारत).

३५. बडे अिंन्दुभूषण, संपूर्ण शुक्रनीति, प्रकाशक-अनिल रघुनाथ फडके, मनोरमा प्रकाशन, १०२/सी, माधववाडी, पहिला मजला, दादर मध्य रेल्वे स्टेशनसमोर, दादर पूर्व, मुंबई-४०००१४.

३६. बापट धुंडिराज गणेश दीक्षित (अनुवादक) आणि संपादक-हिर्लेकर पु., आवृत्ती प्रथम, कृष्ण यजुर्वेद भाग-१, भाग-२, प्रकाशक-चि.धुं. बापट, कानपूर-१६.

३७. बापट विष्णुशास्त्री, संपूर्ण मराठी भाषांतर, सार्थ श्री मनुस्मृति.

३८. बापट विष्णुशास्त्री, 1911, 1912 - 2nd, कथासरित्सागर-भाषांतर भाग १,२,३,४.

३९. बापट वि.वा, (भाग-१), 1911 - Fourth, कथासरित्सागर-सरळ गोष्टीच्या रूपाने मराठी भाषांतर, प्रकाशक-दामोदर सावळाराम आणि मंडळी.

४०. बापट वि.वा. (भाग-२), 1962 - Fourth, कथासरित्सागर-सरळ गोष्टीच्या रूपाने मराठी भाषांतर, प्रकाशक-दामोदर सावळाराम आणि मंडळी.

४१. बापट वि.वा., 1962-Fourth, कथासरित्सागर-भाग तिसरा.

४२. बापट वि.वा, 1911-First, कथासरित्सागर-गोष्टीरूप मराठी भाषांतर भाग-१, प्रकाशक-दामोदर सावळाराम आणि मंडळी, इंदुप्रकाश छापखाना पुणे.

४३. बापट वि.वा., 1911-First, कथासरित्सागर-सरळ गोष्टीच्या रूपाने मराठी भाषांतर, भाग-२, प्रकाशक-दामोदर सावळाराम आणि मंडळी, इंद्रप्रकाश छापखाना पुणे.

४४. बोरवणकर रामचंद्र गणेश (भाषांतरकार), संपादक-किंजवडेकर रामचंद्रशास्त्री, द्वितीयावृत्ती-जानेवारी १९५६, सार्थ हितोपदेश (मूळ श्लोक, अन्वय, अन्ययार्थ, सरलार्थ, टीपा, संपादकीय पादटीपा, श्लोक, सूची यांसह) भाग पहिला-मित्रलाभ,

मुद्रक व प्रकाशक- दामोदर त्र्यंबक जोशी, बी.ए. (टिळक), व्यवस्थापक चित्रशाळा प्रेस, १०२६, सदाशिव पेठ, पुणे-२.

४५. बलदेव आचार्य, दशम संस्करण-पुनर्मुद्रण २००१, संस्कृत साहित्य का इतिहास, प्रकाशन-शारदा निकेतन, ५ बी, कस्तुरबा नगर, सिंगरा, वाराणसी-२२१०१०.

४६. भट्टाचार्य जीवानन्द विद्यासागर- कथासरित्सागर-सोमदेव-भट्टप्रणित (गद्यरूपांतर)- K.V.A.

४७. भट्ट रामेश्वर (अनु.), 1949-10th, हितोपदेश, निर्णयसागर प्रकाशन, मुंबई.

४८. भट्टाचार्य रेवतीकान्त, 1330-First, हितोपदेशीय मित्रलाभ (विष्णुशर्मा), संस्कृत पुस्तकालय, कलकत्ता.

४९. भट्ट ऋषीश्वरनाथ, 1929-First, कथासरित्सागर, इंडियन प्रेस, लिमिटेड, प्रयाग.

५०. भट्ट भरतराम, हितोपदेश, प्रकाशक-साधना पब्लिकेशन्स, K-4/4, मॉडल टाऊन-II, दिल्ली-११००९.

५१. भावे ह.अ., प्रथमावृत्ती-४ एप्रिल १९७७, द्वितीयावृत्ती-१ फेब्रुवारी १९९७, संपूर्ण पञ्चतन्त्रम्- प्रामाणिक मराठी भाषांतर, वरदा प्रकाशन, सेनापती बापट मार्ग, पुणे-१६.

५२. भावे ह.अ., पहिली आवृत्ती-१ फेब्रुवारी १९९७, हितोपदेश, मुद्रक व प्रकाशक-श्री.ह.अ. भावे (वरदा बुक्स) ३९७/१, सेनापती बापट रोड, पुणे-४११०१६.

५३. भावे ह.अ. (भाषांतर), भागवत दुर्गा (प्रस्तावना व टीपा), पहिली आवृत्ती-१९८०, पुनर्मुद्रण-१-१-१९९५, कथासरित्सागर, मुद्रक व प्रकाशक-ह.अ.भावे (वरदा बुक्स) ३९७/१, सेनापती बापट मार्ग, पुणे-४११०१६.

५४. भावे ह.अ. (भाषांतर), भागवत दुर्गा (प्रस्तावना) पहिली आवृत्ती-१५ ऑगस्ट १९८१, पहिले पुनर्मुद्रण-१५ जून १९९०, दुसरे पुनर्मुद्रण- १५ ऑगस्ट १९९३,

तिसरे पुनर्मुद्रण १९९९, चौथे पुनर्मुद्रण– नोव्हेंबर २००२, पाचवे पुनर्मुद्रण– २००९, सहावे पुनर्मुद्रण– ऑगस्ट २०१२, सातवे पुनर्मुद्रण– जानेवारी २०१५, कौटिलीय अर्थशास्त्र, मुद्रक व प्रकाशक–सरिता प्रकाशन, ३९७/१, सेनापती बापट मार्ग, पुणे–४११०१६.

५५. भावे वि.ल., 1929-First, पञ्चतन्त्र (मराठी ओवी अनुवाद), मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे.

५६. भारती वरदानंद, द्वितीयावृत्ती, गुरूपौर्णिमा, आषाढ शु.१५ शके १९२५, दि. १३ जुलै २००३, श्रीमनुस्मृति (सार्थ सभाष्य), प्रकाशक–अध्यक्ष, श्रीराधादामोदर प्रतिष्ठान, पुणे, 'प्रतिक' ४०३/१, शनिवार पेठ, पुणे–३०.

५७. मीनाकुमारी, 2005-First, हितोपदेश (प्रस्ताविका) जे.पी. पब्लिशिंग हाऊस, दिल्ली.

५८. मिश्र बलदेवप्रसाद, मिश्र ज्वालाप्रसाद, 1840-first, हितोपदेश– पं. नारायणशर्मा विरचित, श्रीवेङ्कटेश्वर यन्त्रालय, मुंबई.

५९. राजपाल एण्ड सन्स, दिल्ली, हितोपदेश– नारायणपंडित, 2012 1st.

६०. राजपाल एण्ड सन्स दिल्ली, 2014- 1st, पञ्चतन्त्र (आचार्य विष्णुशर्मा के लोकप्रसिद्ध संस्कृत ग्रंथ पञ्चतन्त्र का हिन्दी रूपान्तर), लेखक–विष्णुशर्मा.

६१. रेळे नानाभाई सदानंदजी, पहिली आवृत्ती १८९७, पातंजल योगदर्शन.

६२. वर्तक पद्माकर विष्णु, प्रथम प्रकाशन– विजया दशमी, शालीवाहन शके १९०८, अश्विन शुद्ध दशमी, विक्रम संवत २०४२, रविवार दि. १२ ऑक्टोबर १९८६, द्वितीय प्रकाशन– वर्ष प्रतिपदा, शालीवाहन शके १९१७, चैत्रशुद्ध प्रतिपदा विक्रम सवंत् २०५/शनिवार दि. १ एप्रिल १९९५, पातंजल योग–विज्ञाननिष्ठ निरूपण, प्रकाशिका– सौ.शोभना पद्माकर वर्तक, .बी.ए., वर्तकाश्रम ४९७, शनिवार पेठ,

पुणे-४११०३०.

६३. वैदिक गर्जना मासिक जून १८, सम्पादक नयनकुमार आचार्य, प्रकाशक मन्त्री, महाराष्ट्र आर्य प्रतिनिधिसभा सम्पर्क कार्यालय आर्यसमाज परळी-वैजनाथ ४३१५१५.

६४. वल्लभाचार्य श्रीकृष्ण, संस्करण, पुनर्मुद्रित वि.स. २०२८, सन २०११, 'हितोपदेश', 'किरणावली', संस्कृत-हिन्दी-व्याख्याद्वयोपेतः, प्रकाशक- चौखम्बा संस्कृत सीरीज ऑफिस, वाराणसी.

६५. वाळंबे मो.रा., सुगम मराठी व्याकरण, लेखन, प्रकाशक- श्री नितीन गोगटे, नितीन प्रकाशन, अप्पा बळवंत चौक, १४७, बुधवार पेठ, जोगेश्वरी लेन, पुणे-४११००२.

६६. विश्वास, 1995-First, पञ्चतन्त्रकथा, पल्लवप्रकाशनम् बेङ्गलुरू.

६७. शर्मा ओमप्रकाश, प्रथम संस्करण-२०१४, सम्पूर्ण हितोपदेश, मूल संस्कृत एवं सरल भाषा-टीका, प्रकाशक- मनोज पब्लिकेशन्स, ७६१, मेनरोड, बुराडी, दिल्ली-११००८४.

६८. शर्मा तारानाथ, शके १७६३, हितोपदेश (विष्णुशर्मा विरचित).

६९. शर्मा गंगाप्रसाद, नवीन संस्करण-२०१४, पञ्चतन्त्र, नीति के पाँच तंत्रो की शिक्षा पशु-पक्षियों के माध्यम से देकर जीवन में विकास और उन्नति को आधार प्रदान करनेवाली नीति-कथाएँ। प्रकाशक-राजा पॉकेट बुक्स, ३३०/१, मेन रोड, बुराडी, दिल्ली-११००८४.

७०. शर्मा धर्मेन्द्र, प्रथम संस्करण १९९५, पञ्चतन्त्र की सामाजिक एवं राजनैतिक दशा-ऐतिहासिक अध्ययन, प्रकाशक- प्रतिभा प्रकाशन (प्राच्य विद्या प्रकाशक एवं पुस्तक विक्रेता) २९/५ शक्तिनगर, दिल्ली-११०००७.

७१. शर्मा केदारनाथ सारस्वत, प्रथम संस्करण-शकाब्द, १८८२, खृष्टाब्द १९६०,

महाकवि सोमदेव भट्ट-विरचित कथासरित्सागर प्रथम खण्ड, द्वितीय खण्ड, तृतीय खण्ड, प्रकाशक-बिहार-राष्ट्रभाषा परिषद, पटना-३.

७२. शास्त्री गुरूप्रसाद (संस्कृत टीकाकार), हिन्दी टीकाकार- आचार्य श्रीसीतारामशास्त्री, सम्पादक- प्रो. बालशास्त्री, श्रीविष्णुशर्मविरचितम् पञ्चतन्त्रम्, 'अभिनवराजलक्ष्मी', संस्कृत-हिन्दी टीका संहित, प्रकाशक- चौखम्बा सुरभारती प्रकाशन (भारतीय संस्कृति एवं साहित्य के प्रकाशक तथा वितरक) के.३७/११७ गोपालमन्दिर लेन, पो.बा.नं.११२९, वाराणसी, २२१००१.

७३. शास्त्री राजेंद्र, पञ्चतन्त्रम (अपरीजातकम्) Publish by- Narendra Gatagat, Nikita Publication Latur, C/o, Narendra Book Depot, 'Mukundtara' old cloth lane,infront of Canara Bank, Latur 413512.

७४. शास्त्री काशीनाथ, 1980- First, हितोपदेश, हिन्दी टीका, बाबू वैजनाथप्रसाद बुकसेलर, बनारस.

७५. शास्त्री सीताराम, 1955- Thrid, हितोपदेश, अभिनव, राजलक्ष्मी-संस्कृत टीका, भार्गव पुस्तकालय, गायघाट, बनारस.

७६. शास्त्री नृसिंहदेव, 1989- First, पञ्चतन्त्रम् (सुबोधिनी व्याख्या), मे.लक्ष्मणदास, संस्कृत हिंदी पुस्तक विक्रेता लाहौर.

७७. शास्त्री भानुदत्त, 1962- First, पञ्चतन्त्रम्-श्री विष्णुशर्म संकलित विषमस्थल विवृतिसहितम्, चौखंबा संस्कृत सिरीज ऑफीस, वाराणसी.

७८. शास्त्री जगदीशलाल, 1970- First, कथासरित्सागर, मोतीलाल बनारसीदास दिल्ली.

७९. सबनीस रा.प., 1927- 2nd, हितोपदेश अथवा हितोपदेशातील निवडक भागाचे

मराठी भाषांतर (पूर्वार्ध) शिक्षक प्रसारक, ग्रंथशाळा, पुणे.

८०. सातवळेकर श्रीपाद दामोदर, पुनर्मुद्रण युगाब्ध ५१०० सन् १९९८ श्री महाकवि वाल्मीकी प्रणीत रामायण, भाग-१- बालकाण्ड (मराठी अनुवाद व उपसंहार यांसहित) प्रकाशक-स्वाध्याय मंडळ, पोस्ट- स्वाध्याय मंडळी (पारडी) पारडी (जि.बलसाड) पीन कोड- ३९६१२५.

८१. साठे भालचंद्र (अनुवाद), पञ्चतन्त्र आणि लीडरशिप, प्रकाशक-अरविंद घनःश्याम पाटकर, मनोविकास प्रकाशन, फ्लॅट नं.३/ए चौथा मजला, ६७२, शक्ति टॉवर्स, नारायण पेठ, नु.म.वि. समोरील गल्ली, पुणे- ४११०३०.

८२. हुडाळीकर एस.बी., 1972- First, हितोपदेशातील कथा, Chandarani Publishing House, Bombay-5.

८३. योगी भारतीय, 1995- First, पञ्चतन्त्र (सरल हिंदी अनुवादसहित), संस्कृति संस्थान्, बरेली, उत्तर प्रदेश.

## इंग्रजी संदर्भ ग्रंथ सूचि

84. Apte M.S., 1897- First, Hitopdesh by Bhatt Narayana, H.N. Gokhale Arya Bhushan Press, Poona.

85. Apte M.S., 1921, Panchatantra, (4 and 5th trans) of Vishnu Sharma. M/s Gopal Narayana and Co. Bombay.

86. Apte M.S., 1909- First, Panchatantra (First Tantra) Mrs. R.A. Sagoon Bookseller and Publisher, Bombay.

87. Aiyer G.V. and M.C. Salakopahryar, 1907- First, Hitopdesa of Pt. Narayana (Pts I and II) Nirnaysagar-Press Bombay.

88. Awasthi Shripati, 2009- First, Hitopdesh (Sanskrit Text, English Trans) Notes and Index of Verses. I.P. Publishing House, Delhi.

89. Ayyer A.S. , 1931, Panchatantra and Hitopdesh, D.B. Tarabovewala Sans and Co. Bombay.

90. Bilher, 1891- 4th, Panchantra IV and V , Govt. C.B. Depot, Bombay.

91. Bilher, 1891, Panchatantra (I and II) Govt of Bombay.

92. Durgaprasad and K.P. Parab, Kathasaritsagar of Somdeva Bhatt, Parimal Publication, Delhi.

93. Durgaprasad, Kathasaritsagar by Somdeva,

94. Durgaprasad and Parab K.P., Kathasaritsagar, Pub. Nirnaysagar Press, Bombay.

95. Hale Worthom B., First, Hitopdesa or the Book of Good Counsil, Gorge Rautledge of Sans. Hd. London.

96. Johnson Francis, 1867- First, Hitopdesa (The Sanskrit Texts), W.H. Allen and Co. B. Waterloo, Places, S.W. London.

97. Kale M.R. ed. Shripati Avasti , 2011- First, Hitopdesha (Sanskrit Text with English Translation Notes).

98. Kanhyalal, 1903- 2nd, Hitopdesha of Shrimandhawala Chandrashrit Narayana Pandit, (with Hiroli Commentray), Hariprasad Bharitath, Bombay.

99. Kale M.R., 1915- 4th, Hitopdesha of Narayan: (with English

Translations), Oriental Pub. Co. Bombay.

100. Kanhyalal, 1916- First, Hitopdesh, V. Hariprasad Bombay.

101. Kale M.R., 1982- Third, Panchatantra of Vishnusharma, Motilal Banarasidas, Delhi.

102. Kutty K.Eshwaran, 2010- First, Panchatantra (The Five Tactics), Sanskrit Academy Osmania University, Hyderabad.

103. Parab K.P. 1955/1958- Fifteenth, Hitopdesa of Narayana Pandit, Nirnaysagar Press, Bombay.

104. Parab Kashinatha Pandurang, 1902- First, Vishnusharma Sankalit Panchatantrakam, Nirnaysagar Press Publications.

105. Parab, Hitopdesh, 1893- 4, Nirnarysagar Press, Bombay.

106. Peterson Peter, 1887-1st, Hitopdesa & Narayana Govt. Central Book Depot., Bombay.

107. Peterson Peter, 1999- First, Hitopdesh Text with introduction and notes in English, Bhartiya Book Corp., Delhi.

108. Ram Narayan, 1947, Hitopdesa, Nirnaysagar.

109. Ram Narayana 1950- 9th, Panchatantram (Satikam), Nirnaysagar Press, Bombay.

110. Ryder A.W., 1949- First, Panchatantra (English Trans.) Jaico Publishing House, Bombay.

111. Sternbach Ludwik, 1960- First, Hitopdesha And Its Sources, Amrican Oriental Society, New Haven.

112. Shahtri Jagdishlal, Kathasaritsagar, Somdeva.

113. Tawney C.H., Kathasaritsagara Stories from Towney C.H.

114. Towney C.H., Vol-2, Kathasaritsagar Ocean of the Streams of Story.

**।। शुभं भवतु ।।**